दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ गुरुवार, दि.२० मार्च २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १५७ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

क्रिडा गुण सवलतीचे अर्ज ५ एप्रिल पर्यंत ऑनलाईन सादर करण्याचे आवाहन

वर्धा : सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून क्रिडा गुण सवलतीचे अर्ज ऑनलाईन स्विकारण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे शाळा व महाविद्यालयातील १० वी व १२ वी प्रविष्ठ होणा-या पात्र खेळाडूंचे क्रिडा गुण सवलतीचे अर्ज दि. ५ एप्रिल पर्यंत ऑनलाईन सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यावर्षी इयता १० वी व १२ वी परिक्षांचा निकाल दि. १५ मे २०२५ पुर्वी जाहिर करण्याचा राज्य शिक्षण मंडळाचा मानस असल्याने क्रिडा गुण सवलत अर्जावर आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी पुरेसा कालावधी मिळावा याकरीता शाळा व महाविद्यालयातील १० वी व १२ वी प्रविष्ठ होणा-या पात्र खेळाडूंचे क्रिडा गुण सवलतीचे अर्ज दि. ५ एप्रिल पर्यंत सादर करावे, त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केल्या जाणार नाही, असे जिल्हा क्रिडा अधिकारी आशा मेश्राम यांनी कळविले.

जिल्ह्यात २० व २२ मार्च रोजी यल्लो अलर्ट : २१ मार्च रोजी ऑरेंज अलर्ट

विजेच्या कडकडाटासह गारपिट होण्याची शक्यता

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : भारतीय हवामान खात्याने वर्धा जिल्ह्यात दि. २० व २२ मार्च रोजी यल्लो अलर्ट व दि. २१ मार्च रोजी ऑरेंज अलर्ट वर्तविला असून या कालावधीत जिल्ह्यातील काही ठिकाणी विजेच्या कडकडाटासह गारपीट होण्याची शक्यता वर्तविली आहे. तसेच त्यावेळी ४० ते ५० किलोमीटर प्रति तास वारे वाहण्याची शक्यता वर्तविली आहे. नागरिकांनी आवश्यक काळजी घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

शेती : गारपिटमुळे फळझाडे, भाजीपाला आणि इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान टाळण्यासाठी शेतक-यांनी पिकांचे संरक्षण करण्याकरीता तात्काळ उपाययोजना करव्यात.

वाहतुक : रस्ते गारांमुळे निसरडे होऊ शकतात. वाहनचालकांनी सावधगीरी बाळगावी. आवश्यक नसल्यास प्रवास टाळावा.

सार्वजनिक सुरक्षितता : नागरिकांनी उघड्या जागेत जाण्याचे टाळावे. गारपिटीपासुन बचावासाठी सुरक्षित ठिकाणी असरा घ्यावा.

विज गर्जना होत असताना शक्यतो घरातच राहणे आवश्यक आहे. अशा कालावधीमध्ये मोबाईल फोन सोबत बाळगू नये. विज गर्जना सुरू असताना घरातील इलेक्ट्रिकल उपकरणे बंद ठेवावी. पाऊस व विज गर्जना होत असताना चुकूनही झाडाच्या खाली उभे राहू नये व शेतात काम करत असताना सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा.

प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे आणि हवामान खात्याच्या अद्यतनांकडे लक्ष द्यावे. घराबाहेर असल्यास मजबूत छताखाली आसरा घ्यावा. गारपीट होत असताना



उघड?या जागेतून वाहन चालवण्याचे टाळावे. विजेच्या तारा किंवा खांबांच्या जवळ जाण्याचे टाळावे. अफवांवर विश्वास ठेवू नका व अफवा पसरवू नका. घडलेल्या घटनेची, आपत्तीची माहिती तात्काळ जिल्हा तसेच तालुका नियंत्रण कक्षास द्यावी.

आवश्यक खबरदारी घेवून स्वतःची त्याच प्रमाणे आपल्या कुटूंबियांची व मित्र परिवाराची काळजी घ्यावी व प्रशासणकडून निर्गमित होत असलेल्या सुचणांचे पालन करून सहकार्य करावे. आपाकालीन परिस्थिती उद्भवल्यास जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती जिल्हा नियंत्रण कक्षाच्या ०७१५२-२४३४४६, २९९०१० या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा आणि गारपिटीमुळे अपेक्षित प्रभाव आणि कृती सूचित

अपेक्षित प्रभाव:

जोरदार वारा, गारपिटीमुळे वृक्षारोपण, बागायती आणि उभ्या पिकांचे नुकसान होऊ शकते. मोकळया ठिकाणी गारांमुळे लोक आणि गुरे जखमी होऊ शकतात. जोरदार वाऱ्यामुळे असुरक्षित संरचनांना आंशिक नुकसान, कच्च्या घरांचे/भिंती आणि झोपड्यांचे किरकोळ नुकसान. सैल वस्तू उडू शकतात.

कृती सुचवली:

घरातच रहा, खिडक्या आणि दरवाजे बंद करा आणि शक्य असल्यास प्रवास टाळा. सुरक्षित निवारा ध्या; झाडाखाली आसरा घेऊ नका. काँक्रीटच्या मजल्यावर झोपू नका आणि काँक्रीटच्या भिंतींना झुकू नका. इलेक्ट्रिकल/इलेक्ट्रॉनिक उपकरणे अनप्लग करा. ताबडतोब जलकुंभातून बाहेर पडा. वीज चालवणाऱ्या सर्व वस्तूंपासून दूर राहा.

प्रदेशासाठी कृषीमाल सल्ला:

फळबागांमध्ये गार जाळी किंवा गारांच्या टोप्या वापरा जेणेकरून त्यांचे यांत्रिक नुकसान होण्यापासून संरक्षण होईल आणि बागायती पिकांना यांत्रिक सहाय्य प्रदान करणे आणि भाजीपाला स्टॅक करणे. परिपक्व झालेली पिके आणि भाजीपाला लवकरात लवकर काढा आणि कापणी केलेले उत्पादन सुरक्षित ठिकाणी ठेवा किंवा शेतात कापणी केलेल्या उत्पादनांचे ढीग ताडपत्रीने झाकून टाका. बागायती पिके आणि भाजीपाला यांत्रिक आधार द्या. असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या अध्यक्ष वान्मथी सी यांनी कळविले आहे.

जामखेड शहराचा जुना प्रारुप विकास आराखडा रद्द करा आणि नवा आराखडा तयार करा ; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : जामखेड शहराचा विकास आराखडा तयार करत असताना कोणावरही अन्याय होणार नाही, याची दक्षता घ्यावी. जामखेडच्या जुन्या प्रारुप विकास आराखड्यावर अनेक हरकती असल्यामुळे हा प्रारुप विकास आराखडा रद्द करून नव्याने पाहणी व सर्वेक्षण करून नवीन शहर प्रारुप विकास आराखडा सादर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानभवनात झालेल्या बैठकी दरम्यान दिले. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली.

यावेळी आमदार सत्यजित तांबे, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता, नगररचना संचालक डॉ. प्रतिभा भदाणे, प्रा. मधुकर राळेभात, अँड. प्रविण सानप, अमित चिंतामणी, मनोज कुलकर्णी, डॉ. ज्ञानेश्वर झेंडे, राहुल अंकुश उगले, शहाजी रामचंद्र राजेभोसले, विनायक राऊत, अविनाश साळुंके, यांच्यासह जामखेडमधील लोकप्रतिनिधी उपस्थित होते. जामखेड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजय साळवे, सहाय्यक नगर रचना संचालक हेही दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले.

जामखेड शहराच्या प्रारुप विकास आराखड्याची घोषणा २६ डिसेंबर २०१८ रोजी झाली. त्यानंतर सर्वेक्षण करण्यात आले व प्रारुप विकास आराखड्यावर हरकती व सूचना मागविण्यात आल्या. या प्रारुप आराखड्यास जामखेडमधून ६१४ हरकती व सूचना प्राप्त झाल्या. नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन यासंदर्भात प्रा. राम शिंदे यांनी या बैठकीचे आयोजन केले.

सभापती प्रा. शिंदे म्हणाले की, जामखेड शहराचा प्रारुप विकास आराखडा तयार करून अनेक वर्षे झाली आहेत. या आराखड्यावर नागरिकांच्या मोठ्या प्रमाणात हरकती आहेत. जामखेड शहर आता वाढले असून यापूर्वीच्या विकास आराखड्यातील रिंगरोड व इतर रस्ते हे शहरामध्ये आले आहेत. त्यामुळे जुना प्रारुप आराखडा रद्द करून नव्याने सर्वेक्षण करून आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे. नव्या आराखड्यात रिंगरोड तसेच इतर रस्त्यांचे रुंदीकरणाचा समावेश करावा.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, जामखेड शहराचा प्रारुप विकास आराखड्यावर सहाशेहून अधिक सूचना आल्या आहेत. त्यामुळे या हरकती व सूचनांचा अभ्यास करून नव्याने पाहणी व सर्वेक्षण करावे. जुन्या प्रारुप आराखड्यातील चुका दुरुस्त करून नव्याने प्रारुप विकास आराखडा तयार करताना त्यामध्ये पारदर्शकता असावीच. तसेच विकास आराखडा तयार करताना कोणावरही अन्याय होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

पाच नद्यांच्या जलपूजनाने जलजागृती सप्ताहाचे उद्घाटन

१६ ते २२ मार्च कालावधीत जलजागृती सप्ताहाचे आयोजन

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : निम्न वर्धा प्रकल्प कार्यालयात दि. १६ ते २२ मार्च या कालावधीत जलजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाचे उद्घाटन बजाज फाऊंडेशन जिल्हा समन्वयक ऋषीकेश हरदास यांच्या हस्ते वर्धा, वेणा, धाम, यशोदा व बोर या पाच नद्यांच्या जलपूजनाने करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी निम्न वर्धा प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता राजेश शर्मा हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन निम्न वर्धा कालवे र.र. हरणखेडे विभागाचे कार्यकारी अभियंता, वर्धा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता नि.न.गुप्ता, उपकार्यकारी अभियंता श्री. भालेराव, प्रकल्प समन्वयक विनेश काकडे यांची उपस्थिती होती.

ऋषीकेश हरदास यांनी जिल्हयामध्ये बजाज फाउंडेशनच्यावतीने पाण्यासंबंधीत कार्य, नदी नाले खोलिकरण, भुगर्भातील पाणी पातळी वाढवण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टींग सारख्या उपाययोजना राबविण्यात येत असल्याचे सांगून पाणी वाचवा पर्यायी जिवण वाचवा, अशाप्रकारे पाण्याचा मानवी जिवणातील महत्वाबाबत मार्गदर्शन केले.

राजेश शर्मा यांनी वापर संस्था सक्षमीकरणा संदर्भात विभागाची भुमिका सिंचन व बिगर सिंचन पाणी पट्टी वसुली याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाप्रसंगी नागरिकांमध्ये जलजागृती पर जनजागृती व पाण्याचे महत्व मनामनामध्ये रूजविण्यासाठी जलप्रतिज्ञा घेण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक. धर्मविर शंभरकर यांनी केले कार्यक्रमाचे संचालन सपना ठमके, यांनी तर आभार पुजा अंभोरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागीय कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी सहकार्य केले.

पुणे जिल्ह्यातील घेरा सिंहगड गावाची पाणीपुरवठा योजना पूर्ण करणार : पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : पुणे जिल्ह्यातील घेरा सिंहगड ग्रामपंचायत हद्दीतील गावांची पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे. ही योजना लवकरच पूर्ण करण्यात येऊन नागरिकांना पाणीपुरवठा करण्यात येईल, असे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी विधानसभेत अर्धा तास चर्चेच्या उत्तरात सांगितले.

सदस्य भीमराव तापकीर यांनी पाणीपुरवठा योजनेबाबत अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती.

या चर्चेला उत्तर देताना मंत्री श्री.पाटील म्हणाले, पुणे जिल्ह्यातील घेरा सिंहगड गावच्या पाणीपुरवठा योजनेच्या प्रस्तावाची छाननी करण्यात येऊन, जल जीवन प्राधिकरण आणि पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी या योजनेच्या कामाची स्थळ पाहणी केली. या पाहणीअंती योजनेचा सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आला. या योजनेबाबत उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांच्याकडे ११ सप्टेंबर २०२४ रोजी बैठक घेण्यात आली. बैठकीत योजनेच्या पूर्णत्वास निधी देण्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे या योजनेच्या पूर्णत्वास निधी अभावी कुठलीही अडचण येणार नाही.

या योजनेचे काम ज्या कंत्राटदाराने केले आहे ते काम निकृष्ट दर्जाचे असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार निकृष्ट कामाची चौकशी करण्यात येईल. काम निकृष्ट असल्यास त्याच कंत्राटदाराकडून हे काम पूर्ण करण्यात येईल, असेही मंत्री श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले.

कोकण किनारपट्टीवरील वीज वाहिन्या भूमिगत करण्यात येणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : कोकण किनारपट्टीवरील जिल्ह्यांत वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्तींमुळे होणारी जीवित आणि वित्तहानी कमी करण्यासाठी कोकण आपत्ती सौम्यीकरण हा ५ हजार कोटींचा कार्यक्रम हाती घेतला आहे. यासाठी बाह्यस्त्रोत बँकांकडून निधी उपलब्ध होत आहे. याअंतर्गत कोकण किनारपट्टीतील सर्व वीजवाहिन्या भूमिगत करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. सदस्य राजन नाईक यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य योगेश सागर, राजेंद्र गावित यांनीही उपप्रश्न उपस्थित केला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वसई मंडळात सुधारित वितरण क्षेत्र योजना (आर. डी. एस.एस.) अंतर्गत २७ किमी विद्युत वाहिन्या भूमीगत करण्यात येत असून त्यापैकी ९.५७ कि.मी. किमीचे काम पूर्ण झाले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाने वसई मंडळांतर्गत भूमिगत विद्युत वाहिन्यांसाठी २११.५५ कोटींच्या प्रकल्पास मंजुरी दिली आहे. लवकरच निविदा प्रक्रिया करण्यात येणार असून दोन वर्षांमध्ये काम पूर्ण करण्यात येणार आहे. कुठल्याही परिस्थितीत डक्ट असेल तिथे ओव्हरहेड वायरला परवानगी न देण्याच्या सूचना मुंबई महापालिकेला दिल्या आहेत. अशा ठिकाणी ओव्हरहेड वायर असतील तर त्या जप्त केल्या जातील असेही त्यांनी यावेळी सांगितले.

पुणे शहरात कौशल्य विकास केंद्र उभारणार : मंत्री उदय सामंत

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : पुणे शहरात शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी येत असतात. तसेच रोजगारासाठी येणाऱ्या तरुण - तरुणींची संख्याही मोठी आहे. पुणे शहरात विद्यार्थी, तरुणांच्या कौशल्य विकासात वाढ करण्यासाठी सी.एस.आर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्स बिलीटी) अंतर्गत कौशल्य विकास केंद्र उभारण्यात येणार असल्याची घोषणा मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात केली.

पुणे महापालिकेत समाविष्ट गावांतील समस्यांबाबत सदस्य विजय शिवतारे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली. या लक्षेवधी सूचनेच्या चर्चेत सदस्य भीमराव तापकीर सहभागी झाले होते.

याबाबत उत्तरात मंत्री सामंत म्हणाले, पुणे महापालिकेतील फुरसुंगी आणि उरुळी देवाची गावे वगळून या दोन्ही गावांसाठी नगरपरिषद स्थापन करण्यात आली आहे. लोकसंख्येचा विचार करून ही नगरपरिषद 'अ' वर्ग दर्जाची करण्याबाबत कोकण विभागीय आयुक्त यांचा अहवाल स्वीकारून दर्जा देण्यात येईल. या नगरपरिषदेला सेवांचे हस्तांतरण पुणे महापालिकेकडून होईपर्यंत पायाभूत सोयीसुविधांची कामे सुरू राहतील.

महापालिकेत नव्याने सहभागी गावांमध्ये मालमता कर दुपटीने वसूल न करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. या गावांचा मालमत्ता कर आधीच्या ग्रामपंचायत कराच्या दुपटीपेक्षा जास्त होणार नाही, अशा पद्धतीने पुनर्विलोकन करेपर्यंत हा कर वसूल करण्यास स्थगिती देण्यात आलेली आहे. फुरसुंगी कचरा डेपोमुळे नागरिकांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घेण्यात येईल. जांभुळवाडी तलावातून पाणीपुरवठा योजनांबाबत विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करून तलावाचे सुशोभीकरणही करण्यात येईल. पुणे महानगरपालिकेतील नव्याने समाविष्ट ३२ गावांच्या समस्या निकाली काढण्याबाबत लवकरच बैठक घेण्यात येईल. फुरसुंगी व उरळी देवाची येथे नागरिकांच्या सोयीप्रमाणे पाणीपुरवठा वेळापत्रक बनविण्यात येईल, असेही मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

धार्मिक पर्यटनाला चालना देण्यासाठी तुळजापूर-पंढरपूर-अक्कलकोट-गाणगापूर कॉरिडॉर विकसित करा : उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

वृत्तसंस्था ■ मुंबई

तुळजापूर पुनर्विकास आणि तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा घेतला आढावा



मुंबई : धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर पुनर्विकास आणि तुळजाभवानी तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या अंमलबजावणीचा आढावा विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतला. या आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करताना स्थानिक नागरिकांना विश्वासात घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. धार्मिक पर्यटनाला चालना देण्यासाठी तुळजापूरसह पंढरपूर, अक्कलकोट आणि गाणगापूर या तीर्थस्थळांचा समावेश असलेला धार्मिक कॉरिडॉर विकसित करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

यासंदर्भात झालेल्या बैठकीस आमदार राणा जगजितसिंह पाटील, धाराशिव जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, पुरातत्व विभागाचे संचालक डॉ. तेजस गर्गे, पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमर कदम यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्पष्ट केले की, तुळजाभवानी मंदिर परिसराचा विकास करताना भाविकांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात, यासाठी विशेष प्रयत्न करावे. यामध्ये रुग्णवाहिका, अग्निशमन आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी स्वतंत्र आराखडा तयार करावा, तसेच ड्रेनेज, पाणीपुरवठा आणि विद्युत वितरण व्यवस्थेचा समावेश करावा, असे निर्देश त्यांनी दिले.

तुळजापूरच्या धार्मिक परंपरांचा विचार करता, जोगते, भोपे, भुते आणि कडकलक्ष्मी या पारंपरिक भक्तांसाठी स्वतंत्र भक्त निवास तयार करण्याचेही डॉ. गोऱ्हे यांनी सुचवले. देवीच्या साड्या, दागिने आणि दानातील वस्तू यांची मोजणी सुयोग्य पद्धतीने व्हावी, असे त्यांनी सांगितले.

तुळजाभवानी मातेच्या ऑनलाईन दर्शनासाठी विशेष सुविधा

शिर्डीच्या साईबाबा मंदिर आणि दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराच्या धर्तीवर तुळजाभवानी मातेच्या ऑनलाईन दर्शनाची सोय चॅनेलद्वारे उपलब्ध करून देण्यात यावी, अशी सूचना डॉ. गोऱ्हे यांनी केली.

विकास आराखड्यासंदर्भात उच्चस्तरीय समितीची बैठक

तुळजापूर पुनर्विकास आराखड्यामुळे मंदिर परिसराच्या विकासाबरोबरच संपूर्ण धाराशिव जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनाला गती मिळेल. तुळजापूर-पंढरपूर-अक्कलकोट-गाणगापूर धार्मिक कॉरिडॉर उभारल्यास भाविकांना अधिक चांगल्या सोयी उपलब्ध होतील आणि या तीर्थस्थळांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्व मिळेल, असेही उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नमूद केले.

आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी विकास आराखड्याची माहिती देताना सांगितले की, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीमध्ये या आराखड्याचे सादरीकरण झाले असून, लवकरच मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होईल. स्थानिक नागरिक आणि पुजारी मंडळाच्या सहकार्याने हा आराखडा प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुरातत्व विभागाच्यावतीने विकासकामांना गती

तुळजापूर मंदिर परिसराच्या संवर्धनासाठी ५८ कोटी ११ लाख रुपयांची विकासकामे सुरू असल्याचे पुरातत्व विभागाचे संचालक डॉ. तेजस गर्गे यांनी सांगितले. पुढील टप्प्यात मंदिर परिसरातील अनधिकृत बांधकामे हटवून, कुंडांचे सौंदर्यीकरण आणि मंदिर संवर्धनाची कामे करण्यात येणार आहेत. तुळजापूर मंदिर व परिसराच्या पुनर्विकासासाठी ३५० कोटी रुपये भूसंपादनासाठी लागणार आहेत. नवरात्र आणि कोजागिरी पौर्णिमेनंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल आणि दोन वर्षांत संपूर्ण विकास आराखड्याची पूर्तता होईल, अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

संपादकीय...

हेही उखडणे जमेल?...

...काही निर्मिती करण्यापेक्षा विध्वंस योजणे अधिक सोपे असते. त्यात मागे जमाव आणि सत्ताधीशही असतील तर हे काम अधिकच सुलभ. पण 'इश्यू' जागता ठेवण्यासाठी विध्वंस इतक्यात होणार नाही. औरंगजेब हा केवळ निमित्त. वाद त्याच्या कबरीचा नसता तर अन्य कोणती कबर, मशीद, मजार असे काही ना काही मिळालेच असते. इंग्रजीत 'कीप द पॉट बॉइलिंग' असा वाक्प्रचार आहे. म्हणजे एखादा मुद्दा सतत तापता ठेवणे. आपल्या देशात सतत असा तापता ठेवता येईल असा मुद्दा म्हणजे हिंदू-मुसलमान संघर्ष. असा संघर्ष नसेल तर तो निर्माण करा, निर्माण झालेला असेल तर तो शांत होऊ देऊ नका आणि तो निमालाच तर निखाऱ्यांवरची राख झटकून ही आग पुन्हा कशी भडकेल असे प्रयत्न करा असा या वाक्प्रचाराचा प्रचलित वातावरणातील अथ. 'हिंदू-मुसलमान मुद्दा नसेल तर मराठा-ओबीसी, दलित-दलितेतर, कथित उच्चवर्णीय विरोधात कथित कनिष्ठवर्णीय, ही विरुद्ध ती भाषा असा कोणता ना कोणता मुद्दा शोधा, तापवा आणि तापता राहील याची खबरदारी घ्या असा हा सांगावा. हे असे मुद्दे धुमसते ठेवणे अनेकांच्या सोयीचे असते. या अनेकांत राजकारणेतरही अनेक येतात. उदाहरणार्थ माध्यमे, सुरक्षा यंत्रणा, बाजारपेठ इत्यादी. माध्यमांकडे या काळात बहुतांशांचे अधिक लक्ष जाते म्हणून माध्यमे खूश. सुरक्षा यंत्रणांस त्यांचा अंमल चालवता येतो आणि हात 'साफ करून' घेता येतात म्हणून ते खूश. बाजारपेठ आनंदी कारण अनेक वस्तूंची मागणी वाढते आणि अधिक काही गंभीर होईल या भीतीने माणसे अनावश्यक चीजवस्तूही खरेदी करून ठेवतात. अखेर लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे भीतीचीसुद्धा एक मोठी बाजारपेठ असते आणि अन्य कोणत्याही बाजारपेठेप्रमाणे ती गजबजती राहील हे पाहणे बाजारपेठ धुरीणांचे कर्तव्य असते. हे सत्य एकदा का लक्षात घेतले की सध्या औरंगजेबाच्या कबरीवरून सुरू ठेवण्यात येत असलेल्या वादाचा अर्थ लावता येईल. कारण यात औरंगजेब हा केवळ निमित्त आहे. त्याच्या कबरीचा वाद पेटवणाऱ्या आणि नंतर तो पेटता ठेवणाऱ्यांच्या सूत्रधारांस हे ठावके नाही, असे नाही. छत्रपती शिवाजी महाराज महान ठरतात याचे कारण त्यांनी आदिलशहा, निजामशहा अशा किरकोळ शाह्यांचा बीमोड केला इतकेच नाही, तर या सर्व शाह्यांस पुरून उरलेल्या कर्दनकाळ 'दुष्ट'घ्न औरंगजेब आणि मुघलांचाही त्यांनी पाडाव केला. महाराज म्हणून अधिक वंदनीय ठरतात. छत्रपतींच्या आसपास, आगेमागे अनेक राजपूत वा हिंदू धर्मीय राजे होते. त्यांस जे साध्य झाले नाही, ते छत्रपतींनी करून दाखवले. आलमगीराच्या क्रौर्याचे आणि तरीही त्याच्या बीमोडाचे मोठेपण त्याच्या कबरीच्या ध्वस्ततेची मागणी करणाऱ्यांस माहीत नाही, असे नाही. वास्तविक छत्रपतींनी टोपीकरांस ज्या रीतीने धुडकावले तो मुत्सद्देगिरीचा सर्वोत्कृष्ट नमुना ठरावा. पण त्याचा गवगवा तितका केला जाणार नाही. कारण उघड आहे. टोपीकर ख्रिाश्चन होते आणि औरंगजेब मुसलमान. त्यामुळे त्याचा संबंध पाकिस्तानशी आणि त्याद्वारे देशातील इस्लाम धर्मीयांशी जोडायची सोय आहे आणि ती ध्रुवीकरणाच्या राजकारणासाठी गरजेची आहे. गोऱ्या टोपीकरांशी आपला थेट वाद नाही. ते बौद्धिकदृष्ट्या झेपणारेही नाही. त्यापेक्षा सद्याःस्थितीत इस्लामींना चेपणे अधिक सोपे आणि सोयीचे. 'घर मे घुसके मारेंगे'ची शूरभाषा म्हणूनच केली जाते ती फुटक्या पाकिस्तानबाबत. खरेतर आपल्या 'घरात' खऱ्या अर्थाने घुसलेला आहे तो चीन. पण त्याच्याबाबत मात्र सौहार्दाची, मैत्रीपूर्ण शांततेची भाषा! त्यामागील कारणही तेच. धर्म आणि सामर्थ्याचा आकार. चीनबाबत अशी भाषा आपल्याला पेलवणारही नाही आणि ते न पेलवणे सर्वांना दिसणे राजकीयदृष्ट्या परवडणारे नाही. तेव्हा सुमारे ४०० वर्षांपूर्वीचा औरंगजेब बरा. त्याच्या नावे बोटे मोडणे, कबरीवर थुंकण्याची भाषा करणे इत्यादी शौर्यदर्शक कृत्ये सद्याःस्थितीत राजकीयदृष्ट्या सोयीची आहेत. खेरीज हे असले आदिम मुद्दे पटवून देणे सोपे आणि पेटवणे त्याहूनही सोपे. सबब औरंगजेब हा केवळ निमित्त. तो नसता, त्याच्या कबरीचा वाद नसता तर अन्य कोणती कबर, मशीद, मजार शोधता आली नसती असे नाही. भारतासारख्या देशात कबरी आणि स्मृतिस्थळांची कमतरता नाही. काही ना काही मिळालेच असते आणि पेटवणाऱ्यांची सोय झाली असती. कारण आग विझवून काही निर्मिती करण्यापेक्षा आग लावून विध्वंस योजणे अधिक सोपे असते. त्यात मागे जमाव आणि सत्ताधीशही असतील तर हे काम अधिकच सुलभ. किती ते बाबरी मशीद पाडताना भारतीयांनी अनुभवले. हाताला काम आणि डोक्याला व्यवधान नसणाऱ्यांची संख्या आपल्याकडे कमी नाही. त्यातील काही शेदोनशे जणांस एकत्र करायचे, पोलीस बघ्याची भूमिका घेतील याची हमी बाळगत औरंगजेबाच्या कबरीवर चालून जायचे आणि ती उद्ध्वस्त करून टाकायची की झाले. आहे काय नि नाही काय! जगातील सर्वात प्राचीन, सर्वात सहिष्णू इत्यादी असलेल्या हिंदू धर्मीयांच्या वैश्विक संघटनेने लोकशाहीची जननी असलेल्या देशात असे करून दाखवण्याचा इशारा दिलेला आहेच. तो अमलात आणणे फार अवघड नाही. पण तरीही तो तातडीने अमलात आणला जाणार नाही. कारण तसे झाले तर 'इश्यू'च संपेल ! आणि इश्यू एकदा का संपला की मग पुन्हा एकदा नवीन मशीद शोधणे आले, नवीन कबर शोधणे आले, त्या विरोधात हवा निर्माण करणारा एखादा देमार चित्रपट निर्माण करणे आले! इतके सगळे उपद्व्याप केल्यानंतर कुठे एखादा मुद्दा कार्यक्रमपत्रिकेवर येतो. तसा आता कुठे औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा तापवता आलेला आहे. त्यामुळे गावागावांत पत्रकार परिषदा घेऊन, भाषणे करून, इशारे देऊन तो अधिकाधिक कसा तापेल आणि तसा तापता राहील याची खबरदारी घ्यायला हवी. त्यानंतर मग 'थेट प्रक्षेपणात' कबर उखडण्याचा साग्रसंगीत कार्यक्रम हाती घेता येऊ शकेल. त्यामुळे इतर ठिकाणच्या अशा कबरींबाबत योग्य तो इशाराही प्रसृत करता येईल आणि पुढचे उखडा-उखडीचे कार्यक्रम हाती घेता येतील. तो हाती घेणाऱ्यांचे सामर्थ्य लक्षात घेता त्यांनी अन्यही काही 'विधायक' कार्यक्रम सुरू करावेत. जसे की प्रशासनातील भ्रष्टाचार त्यांनी उखडून टाकावा. अफझलखान, औरंगजेब यांची कबर उखडून टाकणाऱ्यांनी राज्याच्या प्रशासनातील अकार्यक्षमताही अशीच उखडून टाकावी. दफ्तरदिरंगाई, वेळकाढूपणा आदींचाही नाश त्यामुळे होऊन राज्याचे प्रशासन अधिक गतिमान होण्यास मदत होईल. आपल्या शिक्षणव्यवस्थेत फार मोठे अज्ञान पोसले गेलेले आहे. तेही या मंडळींनी उखडून टाकावे. त्यामुळे निदान सहावी-सातवीच्या मुलामुलींस दुसरी-तिसरीची पाठ्यपुस्तके वाचण्याचे तरी कौशल्य प्राप्त होईल. अज्ञान उखडून टाकणे हे इस्लामी राज्यकर्त्यांच्या कबरी उखडून टाकण्याइतकेच महत्त्वाचे नाही असे कोण म्हणेल? अनेक महाराष्ट्रीय तरुण/तरुणींच्या हातास सध्या काम नाही. या तरुण/ तरुणींच्या हाताचा आणि डोक्याचा रिकामटेकडेपणाही कबर उखडून टाकणाऱ्यांनी समूळ नाहीसा करून टाकावा. आपल्या राज्यातील अनेक महानगरे ही उकिरडे बनलेली आहेत आणि खेडी, गावे बकाल. या नवधर्मरक्षकांनी ठिकठिकाणचे उकिरडे, बकालपणादेखील नष्ट करून टाकावा. नुसत्या अचेतन कबरीची काय मातबरी? या धर्मप्रेमींनी चिंता, क्लेश, दारिद्र्य, दुःख वगैरेंची जागजागी बनलेली थडगीही अशीच उखडून फेकावीत. शेवटचा मुद्दा. ''उंची न आपुली वाढते, फारशी वाटून हेवा'' असे विंदा सांगतात. ते या नवधर्मरक्षकांस ठाऊक असण्याची शक्यता नसल्याने त्यांना सांगायला हवे की दुसऱ्या धर्माचा राग केल्याने स्वधर्मावरील प्रेम सिद्ध होत नाही. तद्वत पराजयींच्या कबरी उखडून टाकण्याने आपला विजय सिद्ध होत नाही. तो आज सिद्ध करावयाचा असेल तर वर उल्लेखलेल्या गोष्टीही उखडून टाकायला हव्यात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि चवदार तळे!

(महाड चवदार तळे सत्याग्रह व भारतीय सामाजिक सबलीकरण दिन विशेष)



दलित महिलांचा मोठा सहभाग आणि विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांचे जीवतोड आवाहन या सत्याग्रहाचे वैशिष्ट्ये ठरले. या सत्याग्रहासाठी स्त्रियांचा सहभाग लक्षणीय असल्याने आणि आपली जात दाखवणारी कोणतीच लक्षणे आपल्या शरीरावर न बाळगण्याविषयी उपस्थित स्त्री-पुरुषांना खास आवाहन केले. त्यातच पुरुषांनाही हातात कायम काठी ठेवण्यासारखी चिन्हे बाळगण्याची आता गरज उरली नाही. तत्कालिक स्त्रिया गुडघ्यापर्यंतच तोकडे लुगडे नेसत असत. डॉ.आंबेडकरांनी स्त्रियांना इतर उच्च जातीय स्त्रीयांसारखे पूर्ण टाच घोळ लुगडे नेसण्यास सुचविले. त्याची अंमलबजावणी लागलीच पुढच्या काही दिवसांतच घडून आली.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

कृगोनि- श्री कृ. गो. निकोडे यांनी लेखात रेखाटलेली ही माहिती... संपादक.

महाड सत्याग्रह हा दि.२० मार्च १९२७ रोजी विश्वरत्न बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात करण्यात आला. रायगड जिल्ह्यातील महाड येथील सार्वजनिक चवदार तळ्याचे पाणी अस्पृश्यांना घेता यावे, म्हणून केलेला हा सत्याग्रह होता. यामुळेच २० मार्च हा दिवस सामाजिक सबलीकरण दिन म्हणून भारतात साजरा केला जातो. महामानव डॉ.आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली लोकांनी मोठ्या संख्येने एकत्र येऊन केलेली ही पहिली सामायिक कृती होती. या सत्याग्रहास महाडचा सत्याग्रह, चवदार तळ्याचा सत्याग्रह, महाडचा मुक्तिसंग्राम किंवा महाडची सामाजिक क्रांती म्हणूनही ओळखले जाते.

भारतीय जातीव्यवस्थेमुळे अस्पृश्यांना उच्च जातीय हिंदूंपासून वेगळे ठेवण्यात आलेले होते. अस्पृश्यांना पाण्याच्या मुख्य स्रोतामधून पाणी घेण्यास तसेच मुख्य रस्त्यावरून चालण्यास परवानगी नव्हती. ऑगस्ट १९२३मध्ये मुंबई कायदे मंडळाने एक निर्णय पारित केला, त्यानुसार सरकारी खर्चाने बांधलेल्या आणि सुस्थितीत ठेवलेल्या सर्व मालमत्तेवर सर्वांना म्हणजेच अस्पृश्यांनाही वहिवाटीचा हक्क असेल. महाडच्या नगरपालिकेनेही जानेवारी १९२४ साली या कायद्याची अंमलबजावणी करणारा निर्णय पारित केला, परंतु त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालीच नाही. सुरेंद्रनाथ टिपणीस, गंगाधर नीलकंठ सहस्त्रबुद्धे व अनंत विनायक चित्रे यांच्यासह अन्य पुरोगामी सामाजिक कार्यकर्ते व सहयोगी महाड सत्याग्रह दरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मदत करण्याचे काम करीत होते. कोकणातील महाड हे शहर सत्याग्रहासाठी निवडले गेले, कारण उच्च जातीय हिंदूंनी हे धोरण प्रत्यक्षात आणण्यासाठी तयारी दाखवली होती. त्यामध्ये अनंत विनायक चित्रे, गंगाधर नीलकंठ सहस्त्रबुद्धे, सुरेंद्रनाथ टिपणीस हे महाड नगरपालिकेचे प्रमुखही त्यांत सहभागी होते. सन १९२७ साली सुरेंद्रनाथ टिपणीसांनी नगरपालिकेचे प्रमुख म्हणून सर्व सरकारी संपत्ती- सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यांसाठी खुली केली आणि त्यानिमित्ताने डॉ.आंबेडकरांना सभा घेण्यासाठी आमंत्रण दिले. सभेनंतर सर्वजण चवदार तळ्याकडे गेले. त्यांनी सर्वात प्रथम त्या तळ्यांमधून पाणी प्यायले आणि त्यानंतर जमलेल्या सर्व लोकांनीही त्या तळ्याचे पाणी प्राशन केले. त्यावेळी स्त्री-पुरुष मिळून सुमारे पाच हजार जण या सभेसाठी व नंतर चवदार तळ्याचे पाणी पिण्यासाठी आलेले होते. त्यातील पुरुष हे आपल्या हातात काठी घेऊन आलेले होते. हातात काठी घेतलेले पुरुष म्हणजे महार जातीच्या पुरुषांचे प्रतिक होते.

सत्याग्रहींवर सनातन्यांचे अत्याचार झाले. जरी महाड नगरपालिकेने सरकारी अखत्यारीतील सर्व पाणवठे अस्पृश्यांना खुले केले असले, तरीही त्या पाणवठ्यांवर तसा कसलाही उल्लेख केला गेलेला नव्हता. त्यामुळे एवढ्या मोठ्या संख्येने अस्पृश्य जमा होऊनही त्यांनी आसपासच्या कोणत्याही पाणवठ्यावरून पिण्यासाठी पाणी घेण्याची हिंमत केली नाही. म्हणूनच या सभेसाठी आलेल्या लोकांच्या पाण्याच्या सोयीसाठी ४० रुपये किमतीचे पाणी उच्च जातीय हिंदूंकडून विकत घेण्यात आले होते. कारण सभेच्या ठिकाणी अस्पृश्यांना आसपासच्या पाणवठ्यावरून पाणी घेण्यास मनाई होती, हे आपण जाणताच की! डॉ.बाबासाहेब चवदार तळ्याचे पाणी पिऊन सभेपुरते ते रहात असलेल्या सरकारी बंगल्यावर परतले आणि इतर सर्व लोक सभेच्या मंडपात परत गेले. चवदार तळ्यावरून सर्वजण निघाल्यानंतर सुमारे दोन तासाच्या आतच महाड गावात एक अफवा उठली की, तळ्यातील पाणी बाटवल्यानंतर आता जमलेला जमाव वीरेश्वराच्या मंदिरात जाऊन मंदिरही बाटवणार आहे. धर्म धोक्यात आल्याची बोंब उच्च जातीय हिंदूंनी महाड गावभर पसरविली. त्यातून उच्च जातीय हिंदूंचा एक घोळका हत्यारे, लाठ्या-काठ्या घेउन सभेच्या ठिकाणी आला व त्यांनी सभेनंतर गावाकडे जाण्यापूर्वी जेवण करत असणाऱ्या अस्पृश्यांना मारहाण केली. हा उच्च जातीयांचा घोळका नंतर महाड शहरभर फिरून सर्व अस्पृश्यांना धमकावत होता. शिवाय आसपासच्या सर्व गावांमध्ये या सभेला आलेल्या सर्व अस्पृश्यांना धडा शिकवण्याबद्दल संदेश पोहोचवला गेला. त्यामुळे अनेक अस्पृश्यांना स्वतःच्या गावी पोहोचल्यानंतरही हिंसेला सामोरे जावे लागले. या सत्याग्रहाला गांधीजींनी पाठिंबा दिला आणि स्पृश्यांनी अस्पृश्यांवर अशाप्रकारे हिंसा करून चुक केली आहे, असे मत त्यांच्या यंग इंडियामध्ये प्रकाशित केले.

विरेश्वराच्या मंदिराच्या गुरवाने अस्पृश्यांनी विरेश्वराच्या मंदिरात प्रवेश करण्याचा कट रचला आहे, अशी अफवा उठविल्यामुळे गावातील सनातनी हिंदुंनी सत्याग्रहासाठी आलेल्या लोकांवर अत्याचार केला. परंतु अहिंसा हे तत्त्व मानणाऱ्या डॉ.आंबेडकरांनी अस्पृश्य सत्याग्रहींना सनातनी हिंदूंविरुद्ध 'हिंसा करू नका!' असा आदेश दिला होता. त्यामुळे एवढी हिंसा होऊनही आणि प्रत्यक्षात स्थानिक लोकांपेक्षा जास्त संख्येने असूनही काठीधारी अस्पृश्यांनी संयम ठेवला. त्याबद्दल गांधीजींनी सर्व सत्याग्रहींचे कौतुकही केले होते. नंतर दि.१९ मार्च १९४० रोजी डॉ.बाबासाहेबांनी महाडमध्ये चौदावा महाड सत्याग्रह दिन आयोजित केला. महाड शहरात त्यांचा मोर्चा व सभा झाली. या दिवशीं महाड नगरपालिका प्रेसिडेंट ?ड.विष्णू नरहरी खोडके यांनी एक समारंभ आयोजित करत त्यांना मानपत्र देऊन गौरविले. खोडके यांनी सन १९३१पासून त्यांच्या चळवळींना पाठिंबा दिला होता.

दलित महिलांचा मोठा सहभाग आणि बाबासाहेबांचे जीवतोड आवाहन या सत्याग्रहाचे वैशिष्ट्ये ठरले. या सत्याग्रहासाठी स्त्रियांचा सहभाग लक्षणीय असल्याने आणि आपली जात दाखवणारी कोणतीच लक्षणे आपल्या शरीरावर न बाळगण्याविषयी उपस्थित स्त्री-पुरुषांना खास आवाहन केले. त्यातच पुरुषांनाही हातात कायम काठी ठेवण्यासारखी चिन्हे बाळगण्याची आता गरज उरली नाही. तत्कालिक स्त्रिया गुडघ्यापर्यंतच तोकडे लुगडे नेसत असत. डॉ.आंबेडकरांनी स्त्रियांना इतर उच्च जातीय स्त्रीयांसारखे पूर्ण टाच घोळ लुगडे नेसण्यास सुचविले. त्याची अंमलबजावणी लागलीच पुढच्या काही दिवसांतच घडून आली, हे विशेष!

!! भारतीय सामाजिक सबलीकरण दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

कोरडी रंगपचमी ..

रंगपचमी सुख सण
धुळवडी धुलिवंदन
राख लावी कपाळा
पावित्र्य टिळा चंदन

उग्रदुष्काळ ठाकला
उध्वस्त जल साधन
यक्ष प्रश्न परिक्षा घेई
रे अपर्याप्त
संसाधन

अपव्यय न पाण्याचा
अतिउत्साहास बंधन
कशी भागवते तहान
उगामातेलं रणक्रंदन

रेनडान्स नवीन प्रथा
जल बचतीला छेदन
वॉटर पार्क वाढवले
करावे मूर्खाभिनंदन

इव्हेंट मॅनेजमेंट वृथा
फासांत अडके गर्दन
हातचे बसे घालवून
करून बसलो मर्दन

उच्च शिक्षित उच्चभ्रू
भलेअसाल बा सधन
अतिरेक वृत्ती अघोरी
बनवे आपणां निर्धन

कोरडी धुळवड योग्य
स्वतांस करी आवेदन
कालानुरूप बदलावे
माणूसपणास निवेदन

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६..

मुळ रंग .

बुरा ना मानो
पंचमी
पुढारी आले रंगात
निवडणूकीचा वारा
घुसला त्यांचे अंगात

हिरवा निळा भगवा
रंग पिवळा हातात
अपेक्षा एकच मनात
परिवर्तीत हो मतात

चेहरा माझा रंगवला
मिसळे त्यांचे पक्षात
माझा रंग रे कोणता
राहिले नाही लक्षात

प्रत्येक पुढारी म्हणे
तू आमच्या भात्यात
सगळे वाटले माझेचं
फरक नाही नात्यात

आपलाचं कार्यकर्ता
सगळे मला मानतात
माणूस भले कुणीही
रंग कोणता पाहतात

रंग सगळा उतरला
चेहराधुतला जोरात
मी आलो मुळरंगात
थांबली माझी वरात

निवडणूकीच्या पूर्वी
सन्मानजणूं जामात
सर्व सामान्य माणूस
माझी फालतूजमात

- हेमंत मुसरीफ पुणे .
९७३०३०६९९६.

पूर्व आणि पश्चिम द्रुतगती महामार्गावर विशेष स्वच्छता मोहीम; पहिल्या दिवशी हटवला २५ टन राडारोडा, ४ टन कचरा

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : मुंबईतील शासकीय, महानगरपालिका तसेच खासगी रुग्णालय परिसराच्या स्वच्छतेची व्यापक मोहीम पार पाडल्यानंतर आता मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने पूर्व आणि पश्चिम महामार्गांची व्यापक स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. १७ ते २२ मार्च या कालावधीत रोज रात्री १० ते दुसऱ्या दिवशी सकाळी ६ दरम्यान ही मोहीम राबवली जाणार आहे. यामध्ये २५ टन राडारोडा, ४ टन कचरा आणि ५.५ टन अन्य टाकाऊ वस्तू संकलित करून त्यांची विल्हेवाट लावण्यात आली.

मुंबईतील मुख्य रस्ते, गल्लीबोळ, रुग्णालये, अन्य सार्वजनिक ठिकाणे तसेच वर्दळीच्या ठिकाणी उत्तम दर्जाची स्वच्छता राहावी, या उद्देशाने महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांच्या निर्देशांनुसार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनात 'स्वच्छ मुंबई, सुंदर मुंबई' हा ध्यास घेऊन विविध उपक्रम राबविले जात आहेत. सखोल स्वच्छता, स्वच्छता हीच सेवा, कचरामुक्त तास आदी स्वच्छताविषयक अभियान यशस्वीपणे राबविल्यानंतर आता प्रशासनाने अन्य सार्वजनिक ठिकाणीही विशेष स्वच्छता मोहीम राबविण्याचे काम हाती घेतले आहे. याच पार्श्वभूमीवर, १७ ते २२ मार्च २०२५ या कालावधीत रोज रात्री १० ते दुसऱ्या दिवशी सकाळी ६ दरम्यान मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पूर्व आणि पश्चिम द्रुतगती महामार्गांची विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे.

या विशेष स्वच्छता मोहीमेची सुरुवात सोमवारी रात्री पूर्व द्रुतगती महामार्गावर शीव (सायन) येथून तर पश्चिम द्रुतगती महामार्गावर वांद्रे येथून झाली. मेकॅनिकल पॉवर स्वीपर्स, लिटर पिकर्स, मिस्टिंग यंत्र, डंपर आणि पाण्याचे टँकर्स अशा एकूण १६ यांत्रिक स्वच्छता संयंत्रांचा या मोहिमेत समावेश होता. या मोहिमेअंतर्गत, महामार्गाच्या ठिकाणी सेवा रस्ते, उतार (रॅम्प) आदी परिसर स्वच्छ करण्यात येत आहेत. धूळ निर्मूलनासाठी यांत्रिक झाडू संयंत्रे (मेकॅनिकल स्वीकिंग मशीन) तसेच स्वच्छतेसाठी जेटींग, प्रेशर वॉशर यासारख्या संयंत्राचा वापर केला जात आहे.

तसेच रस्त्यावरील वाहतुकीसाठीची सांकेतिक चिन्हे, चौकातील फलक आणि दिशादर्शक फलक यांचीही स्वच्छता, रंगरंगोटी आणि देखभाल दुरूस्ती केली जात आहे. द्रुतगती महामार्गालगतच्या कचरा पेट्यांमधील कचरा आणि संकलित केलेला राडारोडा वाहून नेणे, रोपे आणि झाडांभोवतीच्या कुंपणाचा कचरा काढणे, झाडांच्या बुंध्यांची रंगरंगोटी करणे, बस थांब्यावरील आसन व्यवस्था नीट करणे, अडगळीतील वस्तू आणि कचरा हटवणे, सार्वजनिक परिसरातील कचरा पेट्यांची स्वच्छता, तसेच गरजेनुसार दुरुस्ती करणे, सार्वजनिक प्रसाधनगृह परिसरात नियमित स्वच्छता करणे, रस्त्यावर अडथळा ठरणाऱ्या जुन्या वाहनांचीही विल्हेवाट लावणे आदी नियोजन देखील या मोहिमेत केले आहे. पदपथांचे पेव्हर ब्लॉक, दुभाजकांची दुरुस्ती व रंगरंगोटी करणे, अनधिकृत फलक, जाहिरात फलक (होर्डिंग) आदी निष्कासित करणे, या बाबींचा देखील मोहिमेत समावेश आहे.

एका दिवसात १६ किलोमीटर परिसराची स्वच्छता

मोहिमेच्या पहिल्याच दिवशी (१७ मार्च रात्री १० पासून १८ मार्च रोजी सकाळी ६ पर्यंत) दोन्ही महामार्गांवर मिळून एकूण १६ किलोमीटर अंतराच्या रस्त्यांची स्वच्छता करण्यात आली. चेंबूर, विद्याविहार, कुर्ला या विभागातून जाणाऱ्या पूर्व द्रुतगती महामार्गावरील एकूण ८.८ किलोमीटर, तर एच पूर्व आणि के पूर्व विभागातून जाणाऱ्या पश्चिम द्रुतगती महामार्गावरील एकूण ७.८ किलोमीटर अशी मिळून एकूण १६.३ किलोमीटर अंतराच्या रस्त्याची पहिल्या दिवशी स्वच्छता करण्यात आली.

पाच दिवसात टप्प्याटप्प्याने स्वच्छता

या मोहिमेअंतर्गत घाटकोपर - विक्रोळी व अंधेरी - कांदिवली ९० फूट मार्ग, विक्रोळी - मुलुंड चेक नाका व ९० फूट मार्ग कांदिवली - दहिसर चेक नाका, शीव - घाटकोपर व वांद्रे - अंधेरी, घाटकोपर - विक्रोळी व अंधेरी - कांदिवली ९० फूट मार्ग तसेच विक्रोळी - मुलुंड चेक नाका व ९० फूट मार्ग कांदिवली - दहिसर चेक नाका या परिसरातून जाणाऱ्या पूर्व आणि पश्चिम द्रुतगती महामार्ग, तसेच त्यांना जोडणाऱ्या रस्ते परिसराची स्वच्छता टप्प्याटप्प्याने करण्यात येईल, असे उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) किरण दिघावकर यांनी सांगितले.

प्रियकर आणि दोन मित्रांसह पतीच्या हत्येचा रचला कट; महिलेसह साथीदाराला अटक, दोघे फरार

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : पतीची हत्या केल्याप्रकरणी गोरगाव येथील २८ वर्षीय महिलेला अटक करण्यात आली आहे. तिने आपला प्रियकर आणि त्याच्या दोन मित्रांच्या मदतीने पतीची हत्या केली. प्रेमसंबंधात पती अडसर ठरत असल्यामुळे त्याचा काटा काढण्यात आला. याप्रकरणी दिंडोशी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

याप्रकरणी दिडोशी पोलिसांनी भारतीय न्याय सहिता कलम १०३ (१), ६१ (२) अंतर्गत गुन्हा दाखल केला असून आरोपी महिलेसह तिच्या साथीदारालाही पोलिसांनी अटक केली. आरोपी प्रियकर आणि त्याचा दुसरा मित्र फरार असून त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

घटना कशी घडली ?

दिंडोशी पोलिसांच्या माहितीनुसार, रंजू चौहान (२९, बंजारीपाडा, गोरेगाव पूर्व) हिने तिचा पती चंद्रशेखर चौहान (३५) याची हत्या करण्यासाठी आपल्या प्रियकरासोबत कट रचला. चौहान फिल्म सेटवर कामगार म्हणून काम करत होता. चंद्रशेखर चौहान शनिवारी सकाळी घरी बेशुद्ध अवस्थेत आढळला. त्याला तातडीने ट्रॉमा केअर रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. प्राथमिक शवविच्छेदन अहवाल उपलब्ध नसल्याने, पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली.

महिलेच्या बोलण्यात विसंगती

पती रात्री ठणठणीत होता. नेहमीप्रमाणे तो रात्री झोपला, सकाळी बराच वेळ चंद्रशेखर झोपेतून उठला नाही, तसेच तो कोणताही प्रतिसाद देत नव्हता, अशी माहिती रंजू चौहान हिने पोलिसांना दिली. मात्र, पोलिसांना तिची माहिती संशयास्पद वाटली आणि त्यांनी चौकशी सुरूच ठेवली. महिलेच्या मोबाइल कॉल रेकॉर्ड्समुळे पोलिसांना मोठा सुगावा दिला. आपण रात्री १.३० वाजता झोपलो होतो, असे रंजूने पोलिसांना सांगितले. मात्र तिच्या मोबाईलवर रात्री १.३० नंतर दूरध्वनी आले होते. त्यांची तपासणी केली असता ती दोन व्यक्तींच्या वारंवार संपर्कात असल्याचे निष्पन्न झाले.

चौकशीत गुन्ह्याची कबुली

या तपासाच्या आधारे पोलिसांनी महिलेला ताब्यात घेतले आणि तिची चौकशी केली असता तिने गुन्ह्याची कबुली दिली. तिने प्रियकर आणि त्याच्या दोन मित्रांच्या मदतीने पतीला गळा दाबून ठार मारल्याचे सांगितले. गुन्ह्याच्या वेळी आरोपी महिला घटनास्थळी उपस्थित होती. तिने हत्या करण्याआधी काही काठ्या आणि अन्य साहित्य गोळा केले होते. गळा दाबताना प्रतिकार केलाच तर पतीला काठी व इतर साहित्याने मारण्याचा कट होता.

फक्त ६ तासांत गुन्हा उघडकीस

उपायुक्त (परिमंडळ-१२) स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि दिंडोशी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अजय अफळे यांच्या पथकाने केवळ ६ तासांत या गुन्ह्याची उकल केली. रंजू चौहान आणि तिचा एक साथीदार मोइनुद्दीन लतीफ खानला (२०) हत्या आणि कट रचल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. याप्रकरणी आरोपी प्रियकर शाहरूख व मित्र शिवदास यांचा शोध सुरू आहे. त्यासाठी तीन पथके तयार करण्यात आली आहेत.

खाकी वर्दीत बलावतेय गुन्हेगारी



परभणी ■ दत्तात्रय कराळे

परभणी : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात खाकी वर्दीतील बहुतांश पोलीस कर्मचारी व पोलीस अधिकाऱ्यांनी वाईट कृत्यांवर पांघरुण घालत गुन्हेगारांना नेहमीच प्रोत्साहन दिले. एवढेच नाही तर विरोधकांवर दबाव टाकत तक्रारकर्त्यांनाच सतत दाबण्याचा अश्लाघ्य प्रयत्न केल्याचे एसआयटीच्या चौकशीतून पुढे आले आहे. ज्यांची चौकशी सुरु आहे व ज्यांना निलंबित करण्यात आले आहे, ते संबंधित अधिकारी कालच्या होळी सणाच्या निमित्ताने मोठ्या दिमाखात रंगपंचमी खेळत होते. ते सुद्धा ज्या न्यायदालनात बीडचे 'ते' वादातीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, ते न्यायाधीश सुद्धा त्यांच्या सोबतीला रंगपंचमी खेळत होते. याचाच अर्थ (काही अपवादात्मक) न्यायव्यवस्था व पोलीस यंत्रणा आजघडीला नेमकी कुठं जात आहे, हेच कळत नाही.

परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशीच्या हत्येस जबाबदार एलसीडी पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांच्यासह अन्य तीचे पोलीस कर्मचारी यांना कायद्याचं शिक्षण घेणारा तरुण सोमनाथ सूर्यवंशीच्या हत्येप्रकरणी जबाबदार धरुन त्यांना निलंबित करण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी तेच अशोक घोरबांड खुलेआम उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी हितगुज करतांना अनेकांना दिसले. आपली पोहोच कुठपर्यंत आहे, जणू हेच त्यांनी दाखवून दिले असावे. त्याच अशोक घोरबांड त्यांच्यावर आणखी एका कथित एन्काऊंटरच्या पडद्याआडून हत्या केल्याचा थेट आरोप केला जात आहे. वसमत तालुका नांदेड येथील त्यांची बहुतांश कारकीर्द ही फारच वादग्रस्त ठरल्याची टीका होतेय. असाच आणखी एक तिसरा खळबळजनक प्रकार नांदेड जिल्ह्यातील हदगाव पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर यांच्या बाबतीत पुढे आला आहे.

हदगाव पोलीस ठाण्याअंतर्गत पेवा गावचे पोलीस पाटील बालाजी जाधव यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा थेट आरोप भडीकर यांच्यावर असून त्याप्रकरणीचा भडीकर यांच्यावर गुन्हाही दाखल झाला आहे. मागील अनेक दिवसांपासून पोलीस पाटील बालाजी जाधव यांना पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर हे मानसिक त्रास देत होते, असे पोलीस पाटील जाधव यांच्या चिरंजीवाने तक्रारीत नमूद केले आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्दयी हत्येतील आरोपींना कर्तव्यावरील पोलीस व काही पोलीस अधिकाऱ्यांनी पाठीशी घालत संरक्षण दिल्याचा तक्रारकर्त्या विरोधकांवर दबाव निर्माण करीत होते असा ठपका ठेवल्याचे समजतेय. परभणी येथे सोमनाथ सूर्यवंशीच्या हत्येस जबाबदार पोलीस अधिकारी यांचावर केवळ हीच हत्या नव्हे यापूर्वीही वसमत तालुक्यातील हट्टा येथे बनावट एन्काऊंटर दाखवत जाणीवपूर्वक हत्या केल्याचा आरोप ठेवला गेला आहे. तर परळीसह बीड जिल्ह्यातील अनेक ठिकाणी नमूद आरोपींवर कायद्याचा बडगा दाखवून वेळीच नियंत्रण न आणता खाकी वर्दीतील याच पोलीस व पोलीस अधिकाऱ्यांनी त्या गुन्हेगारी प्रवृत्तीला बळ दिल्यामुळे तेथील गुन्हेगारी शिगेला पोहोचली गेली आहे. असं सर्वत्र खुलेआम बोलं जात आहे.

दरम्यान, एका खून प्रकरणी माहिती दडवल्याचा खोटा आरोप ठेवत पोलीस निरीक्षक हे पोलीस पाटलास जाणीवपूर्वक मानसिक त्रास देत होते. तर असा कोणताही प्रकार नसून मी माझे कर्तव्य इमाने इतबारे पार पाडल्याचे पोलीस पाटलाने वारंवार सांगितले. त्या असह्य जाचालाच कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे घटनेपूर्वी आपल्या मोबाईलमध्ये एक व्हिडिओ क्लीप बनवून पाटील यांनी समाज माध्यमांवर व्हायरल केली होती. त्या व्हिडिओ क्लीप मुळेच हा खळबळजनक प्रकार चव्हाट्यावर आला असून त्या आधारेच भडीकर यांच्यावर त्याच पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

एकूणच काय तर या खाकी वर्दीतील गुन्हेगारीने मागील काही कालावधीपासून डोके वर काढल्याचे दिसत आहे. कायदा व सुव्यवस्थेबरोबरच जनतेच्या संरक्षणाची जबाबदारी ज्यांच्यावर बंधनकारक आहे, त्याच पोलीस यंत्रणेतील काही अशी मुजोर बांडगुळं काळया कमाईतून बेफाम होत आहेत. त्याचाच परिपाक म्हणून अन्य गुन्हेगारांना ही लाजवतील असे मानवीय हिंसाचारी कृत्य करुन थेट खाकी वर्दीलाच कलंक लावत आहेत. वरील सर्व नमूद घटना ध्यानी घेतल्या तर यात लिप्त पोलीस तथा पोलीस अधिकाऱ्यांची मुजोरी ही घटनाबाह्य असली तरी ती खाकी वर्दी घ्या आडून केली जात असल्याने मानवतेला काळीमा फासत आहे, हे मुळीच विसरुन चालणार नाही. शासनाने वेळीच सावध होऊन पोलीस खात्यात वाढत असलेली अशी मुजोरी वेळीच ठेचून काढली नाही तर ती शासन, प्रशासन, खाकी वर्दी व मानवतेला कलंकित केल्याशिवाय राहणार नाही. मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे चाणाक्ष आहेत. मुरब्बी राजकारणी आहेत. तसेच ते कर्मठ नि कठोर प्रशासक म्हणूनही सर्वज्ञात आहेत. यातील दोषी पोलीस व अधिकारी यांना कठोर शासन हे मिळालेच पाहिजे, अशी जनतेची भावना आहे. तसं नाही झाल्यास राज्यात सर्वत्र अशी प्रकरणं अधिक उफाळून येऊ शकतील. पर्यायाने अशांची मुजोरी अधिकच वाढली जाईल.

नारोडी येथे सलग तेराव्या वर्ष ही शिवजयंती उत्साहात साजरी



आंबेगाव ■ संतोष गावडे

आंबेगाव : आंबेगाव तालुक्यात भक्तीभाव व पारमार्थिक क्षेत्रात नावाजलेल्या नारोडी गावातील हुले स्थळ नंबर दोन येथे ऐतिहासिक शिवकालीन प्रात्यक्षिके, विविध खेळ, अहिल्यानगर येथील प्रसिद्ध शिवव्याख्याते डॉ. नागेश गवळी यांनी छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ आणि छावा धर्मवीर शंभूराजे यांच्या जीवनातील विविध प्रसंगांच्या सादरीकरणातुन, आपल्या अमोघ वाणीतून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. तर रणरागीणी पथक सोळु यांनी ऐतिहासिक शिवकालीन युद्धकला प्रात्यक्षिक केले, अनेक बालव्याख्यात्यांनी छत्रपती शिवरायांच्या जीवनावर भाषणे केली.

शिवज्योत शिवरायांचे जन्मस्थळ किल्ले शिवनेरी वरुन आणण्यात आली, तर महिलांसाठी हळदी कुंकू चा कार्यक्रम ही ठेवण्यात आला होता व आलेल्या भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन देखील करण्यात आले होते.

कार्यक्रमास नारोडी व हुले स्थळ नंबर दोन येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीमान किल्ले रायगड मॉडेल प्रमाणे गड -किल्ले संवर्धन करण्यासाठी सरकार ने पावले उचलावीत-संभाजी राजे छत्रपती

रांजणगाव गणपती ■ बाळासाहेब कुंभार



रांजणगाव गणपती: छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिष्ठित पुतळ्याचे अनावरण व लोकार्पण सोहळा रांजणगाव गणपती येथे श्रीमंत युवराज संभाजी राजे छत्रपती यांच्या शुभहस्ते संपन्न झाला शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर शिरूर तालुक्यात शिवप्रेमींचा उत्साह पाहण्यास मिळाला त्यानिमित्ताने युवराज संभाजी राजे छत्रपती यांनी उपस्थितांशी संवाद साधला सरकार ने श्रीमान किल्ले रायगड मॉडेल प्रमाणे गड -किल्ले संवर्धन करण्यासाठी पावले उचलावीत तसेच कोणाचाही कार्यक्रमात नामउल्लेख न करण्याच्या संयोजकांच्या निर्णयाचे स्वागत केले त्यामुळे गावचा एकोपा दिसून येतो छत्रपतींचे विचार सोबत घेऊन कार्य करणाऱ्या शिवप्रेमी यांच्यासाठी ही प्रेरणा देणारी बाब आहे असे गौरवउद्गार छत्रपती यांनी काढले .

शिवशाही प्रतिष्ठानच्या पुढाकाराने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधीष्ट शिल्पाची उभारणी करण्यात आली त्यावेळी किरणताई वळसे पाटील ,शिरूर आंबेगाव राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मानसिंगभैय्या पाचुंदकर,अजिंक्य डी वाय पाटील युनिव्हर्सिटी चे कुलगुरू प्रा . डॉ .एकनाथ खेडकर ,माजी जिल्हा परिषद सदस्या कविताताई खेडकर ,माजी पंचायत समिती सदस्य विक्रम पाचुंदकर,युवा सेना जिल्हाप्रमुख बापूसाहेब शिंदे,आबासाहेब पाचुंदकर, भिमाजीराव खेडकर ,सरपंच सुवर्णाताई वायदंडे ,उपसरपंच श्रीकांत आबासाहेब पाचुंदकर ,माजी सरपंच सर्जेराव खेडकर ,नारायण पाचुंदकर,दत्तात्रय पाचुंदकर,संदीप दौंडकर ,तुषार पाचुदकर ,राहुल पवार,ओंकार देव,रवींद्र बत्ते,देविदास बत्ते,संतोष सांबारे ,गंगाधर देशमुख ग्रा.वि .अधिकारी, विवेकानंद फंड अध्यक्ष शिरूर तालुका ग्रंथालय संघ इ . मान्यवर उपस्थित होते व पीआय महादेव वाघमोडे साहेब व त्यांच्या सर्व टीमने चोख बंदोबस्त ठेवला होता शुभस्य इव्हेंट चे आकाश साळुंखे यांनी संपूर्ण सजावट व इतर संपूर्ण जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. कार्यक्रमात शाहीर सानप सातारा यांच्या पोवाड्याने रंगत आणली व्यासपीठावर जेष्ठ मंडळी उपस्थित होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा . माणिक खेडकर व सूत्रसंचालन रोहिदास खेडकर /रामेश्वर ढाकणे व आभार अजय गलांडे मा .उपसरपंच ग्रा.पं. रां .ग यांनी तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भानुदास शेळके, नेताजी फंड ,नितीन (काका) लांडे ,अनिलराव शेळके, सतीश वाघुले, सतीश क्षिरसागर, महेश फंड ,प्रताप फंड शिवशाही प्रतिष्ठान, निर्मल ग्रामपंचायत व देवस्थान ट्रस्ट समस्त ग्रामस्थ रांजणगाव व आजी-माजी पदाधिकारी यांनी विशेष सहकार्य केले.

डॉ. संजय कसाब करिअर कट्टा उत्कृष्ट समन्वयक पुरस्काराने सन्मानित

परभणी ■ अरविंद कांबळे



परभणी : पूर्णा (जं .) प्रतिनिधी - येथील स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयातील मराठी विभागाचे अभ्यासू प्राध्यापक, कवी डॉ. संजय कसाब यांना महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या अंतर्गत करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत जिल्हास्तरीय उत्कृष्ट महाविद्यालयीन समन्वयक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याविषयी अधिक माहिती अशी की, नांदेड येथील यशवंत महाविद्यालयाच्या शंकरराव चव्हाण सभागृहात महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, माजी मंत्री डी.पी. सावंत, विभागीय सहसंचालक डॉ. किरणकुमार बोंदर, करियर कट्ट्याचे राज्य समन्वयक डॉ. यशवंत शितोळे यांच्या हस्ते डॉ. कसाब यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रा.डॉ.संजय यांचे विविध सामाजिक व सांस्कृतिक विषयावर लेखन प्रसिद्ध झालेले असून त्यांचे राष्ट्रीय , आंतरराष्ट्रीय परिषदा व चर्चासत्रांमध्ये चाळीसपेक्षा अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत . याशिवाय

त्यांचे चार संपादित ग्रंथ असून ' स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार : जीवन व कार्य ' हे चरित्र त्यांनी लिहिलेले आहे. विविध वर्तमानपत्रे, नियतकालिके व आकाशवाणी वरून त्यांच्या कथा ,कविता व वैचारिक लेखन प्रकाशित आहे .

' साठोत्तरी मराठी साहित्यातील आंबेडकरी विचारांचा प्रभाव : एक विवेचक अभ्यास ' या विषयावर त्यांनी पीएच.डी. चे संशोधन पूर्ण केले आहे. तर ' परभणी जिल्ह्यातील दलित लोकगीतांचा अभ्यास ' हा युजीसी ,नवी दिल्ली येथे लघुशोध संशोधन प्रकल्प पूर्ण केला आहे .

त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव तथा प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार,अध्यक्ष गुलाबराव कदम, महाविद्यालयातील प्राध्यापक ,कर्मचारी व मित्र मंडळी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे .

महाविद्यालयात प्राचार्यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक ,कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

श्री गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालयाचा विद्यार्थ्यांस टेबल टेनिस स्पर्धेत सुवर्णपदक

परभणी ■ अरविंद कांबळे



परभणी : पूर्णा ,अंतर राज्य क्रीडा महोत्सव स्पर्धेत गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्या अंतर्गत चंद्रपूर येथे पार पडलेल्या आंतरराज्य क्रीडा महोत्सव स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या टेबल टेनिस मुलांच्या संघाने प्रथमच स्वर्ण पदक पटकावले आहे. या स्पर्धेत श्री गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालय पूर्णा चा विद्यार्थी अमिष आनंद आठवले याने टेबल टेनिस स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावले आहे. या स्पर्धेत अमिष आठवले यांनी नेत्र दीपक कामगिरी करून आपल्या संघाला सुवर्णपदक मिळून दिले आहे. आंतरराज्य क्रीडा महोत्सव टेबल टेनिस स्पर्धेत महाराष्ट्रातील एकूण २७ संघाने सहभाग नोंदविलेला होता. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या संघाने महाराष्ट्रातील अनेक संघाला पराभूत करून पदक पटकावलेला आहे यात मुंबई, पुणे, सातारा, नागपूर, व कोल्हापूर या संघाला पराभूत केला आहे. या स्पर्धेत अमिष आठवले यांनी एकही मॅच न हरता आपला संघाला सुवर्ण पदक पटकावून दिलेले आहे. त्यास या स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. अमिष आठवले यांना मोलाचे मार्गदर्शन प्रा बरकुंटे. एस.आर यांचे लाभले. त्याच्या या नेत्र दीपक कामगिरीबद्दल श्री गुरु बुद्धीस्वामी शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष श्री प्रमोद अण्णा एकलारे, सचिव श्री अमृतराज कदम, सहसचिव श्री प्रा. गोविंदराव कदम, प्राचार्य डॉ के राजकुमार, उप प्राचार्य डॉ शिवसांब कापसे, उप प्राचार्य डॉ गजानन कुरुंदकर, प्रा.डॉ बर्डे आर.डी, पर्यवेक्षक श्री मिटकरी यु पी, उप प्राचार्य खराटे ऐ यन व सर्व प्राध्यापकांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

संत निरंकारी मिशनच्या वतीने मोफत आरोग्य शिबीर

लोणंद ■ पांडूरंग कुंभार

लोणंद : संत निरंकारी मिशन सातारा झोनच्या वतीने सर्व रोग निदान मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन केले असल्याचे झोनचे प्रभारी नंदकुमार झांबरे यांनी सांगितले.

या शिबिरासाठी डॉ. पुरूषोत्तम अरोरा (प्रसिध्द हृदय विकार तज्ञ बंगरुळ, कर्नाटक),यांच्यासह ११ तज्ञ डॉक्टरांची टीम येणार असून याठिकाणी आवशकतेनुसार काही तपासण्या करून त्यावर मोफत औषधे देण्यात येणार आहेत. तरी गरजू रुग्णांनी याचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहनही श्री. झांबरे यांनी केले.

सदरचे मोफत आरोग्य शिबीर शुक्रवारी २१ मार्च रोजी सांगली जिल्ह्यातील नेवरी सत्संग भावनात, रविवारी २२ मार्च रोजी सातारा जिल्ह्यातील कोरेगावच्या सत्संग भवनात तर २३ तारखेला पुणे जिल्ह्यातील मोरगाव सत्संग भावनात होणार आहेत या सर्वांची वेळ सकाळी १० ते सायं. ५ असणार आहे. हे आरोग्य शिबीर सर्वांसाठी मोफत असून गरजूनी ज्याठिकाणी शक्य होईल त्या ठिकाणी पोहोचून या मोफत आरोग्य शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहनही श्री. झांबरे यांनी केले आहे.

उत्कृष्ट समन्वयक पदाचा प्रथम पुरस्कार



परभणी ■ अरविंद कांबळे

परभणी: पूर्णा : महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या 'करिअर कट्टा' या उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय महाविद्यालयीन स्पर्धा २०२४-२५ चा निकाल घोषित करण्यात आला होता त्यानुसार यशवंत महाविद्यालय येथे पार पड लेल्या विशेष कार्यक्रमांमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ मनोहर चासकर, विभागीय सहसंचालक डॉ किरणकुमार बोंदर, माजी शिक्षण राज्य मंत्री डी पी सावंत यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्रा. डॉ. जितेंद्र पुल्ले रसायनशास्त्र विभाग प्रमुख यांना उत्कृष्ट महाविद्यालयीन समन्वयकपदी प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, त्यानिमित्ताने संस्थेचे कार्याध्यक्ष मा. श्री प्रमोदअण्णा एकलारे, सचिव मा. श्री अमृतराज कदम, सहसचिव मा. श्री गोविंदराव कदम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. राजकुमार उपप्राचार्य डॉ. गजानन कुरुंदकर, डॉ. शिवसांब कापसे यांची उपस्थिती होती तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉजी.पी. कापुरे यांनी केले तर आभार डॉ अजय कुर्हे यांनी मानले.

पालक रागावल्याने १३ वर्षीय मुलींनी सोडले घर ; एका तासात दोन्ही मुलींचा शोध; चंदननगर पोलिसांची कामगिरी

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर



(पुणे) वाघोली : घरातील कुटुंबीय आपल्यावर नेहमीच रागावतात म्हणून एकाच शाळेत शिकणाऱ्या दोघा १३ वर्षीय मुलींनी घरातून पळ काढला. दरम्यान, त्या शाळेत न आल्यामुळे दोघी बेपत्ता झाल्याचे पालकांना कळाले. त्यांनी चंदनगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. अवघ्या एका तासात दोन्ही मुलींचा शोध घेऊन पोलिसांनी त्यांना सुखरूप कुटुंबीयांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या दोन्ही मुलींना मंगळवारी (दि.१८) सकाळी नेहमीप्रमाणे शाळेत सोडण्यात आले होते. परंतु, सकाळी सातच्या सुमारास त्या शाळेत आल्या नसल्याचे पालकांना कळविण्यात आले. मुली बेपत्ता झाल्यामुळे त्यांनी थेट चंदनगर पोलिस ठाणे गाठले.

घटनेचे गांभीर्य पाहता पोलिसांनी एकीकडे तक्रार दाखल करून घेण्याचे काम सुरू केले, तर दुसरीकडे मुलींचा शोध घेण्यासाठी पथके रवाना केली. त्यातील एका मुलीकडे मोबाईल असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार तांत्रिक विश्लेषणाद्वारे मुलींची माहिती पोलिसांनी घेतली. मुली अधून-मुधून मोबाईल चालू बंद करत होत्या. मुली कसबा पेठ येथे असल्याची माहिती मिळाली. त्या मुली एका रिक्षातून प्रवास करत असल्याचे समजले.

पोलिसांनी संबंधित रिक्षाचालकाला ही माहिती दिली. त्यानंतर पथकाने दोन्ही मुलींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे केलेल्या चौकशीत सुरुवातीला त्यांनी विविध स्टोरी तयार केल्या. परंतु, पोलिसांनी विश्वासात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी सांगितले की, आम्हाला घरातील सतत रागवातात. त्यामुळे आम्ही घरातून जाण्याचा निर्णय घेतला. सकाळी आम्हाला शाळेत सोडल्यानंतर आम्ही तेथून निघून आलो. एका ठिकाणी शाळेचा गणवेश बदलून, हडपसरला इतर ठिकाणी फिरलो. ही कामगिरी पोलिस उपायुक्त हिम्मत जाधव, सहायक पोलिस आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक सीमा ढाकणे, पोलिस उपनिरीक्षक किरण मोरे, अंमलदार विजय टिकेकर, रामचंद्र गुरव, विश्वनाथ गोणे, नानासाहेब परतुरे, अमोल कोळेकर, भारत उकिर्डे, शिवाजी धांडे, मनोज भंडारी यांच्या पथकाने केली.

कोमसाप उरणकडून धवलारीण जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

दै, जनप्रभात उरण ता. प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे



उरण : आगरी,कोळी आणि कराडी या जातीमध्ये लग्न विधीत हळद आणि देवादिकांच्या विधी करण्याचे काम करणाऱ्या ज्या महिला जी गाणी गातात त्याला ' धवला ' आणि तो गाणारनींना धवलारीण असे म्हणतात. त्या वृद्ध स्त्रियांना जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. मान्यवरांच्या शुभ हस्ते त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. हा सत्कार दर महिन्याच्या १७ तारखेला होणा-या विमला तलाव उरण येथील मधुबन कट्ट्यावर ज्येष्ठ कवी संजीव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली लेखिका शर्मिला गावंड ,संपदा पाटील इत्यादिंनी केला.

विमला तलाव मधुबन कट्ट्यावर ज्येष्ठ नागरिक आणि रसिकांना कविसंमेलन आणि विविध उपक्रमातून आनंद देण्यासाठी कोमसाप अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे आणि मधुबन कट्टा अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे ,उरण कोमसाप,रायगडभूषण प्रा.एल. बी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करत असतात. यावेळी २७ बालकवींना कविसंमेलनातून रसिकांपुढे आणले. तसेच तालुक्यातील करंजा येथील अनुबाई पांडुरंग ठाकूर, केळवणे येथील चंद्राबाई गणपत पटील आणि कुडेगावच्या कुसुम काशिनाथ पाटील या तीन वृध्द धवलारीणींना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी धवलारीणींनी धवला गाऊन श्रोत्यांना आगळा वेगळा आनंद दिला. बालकवी अनुज शिवकर याने शिव गौरव गीत गाऊन रसिक प्रेषकांना प्रसन्न केले. अनामिका राम

या बालकवयित्रीने आणि अन्य बालकवींनी आपल्या स्वरचित कवितेने सर्वांना भारावून टाकले. 'उपक्रमांची वारी ' च्या गुणी शिक्षिका असलेल्या लेखिकेला आणि मेहनती शिक्षिका शर्मिला गावंड यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तसेच दोहे लिहिणा-या न.ग.पाटील यांना रायगडभूषण प्रा एल बी पाटील यांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रंजना जोशी यांनी केली. म.का.म्हात्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

'रयत'चे माजी विद्यार्थी,दानशूर व्यक्तिमत्त्व महेंद्रशेठ घरत यांचा शरद पवार यांच्या हस्ते सत्कार!

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे



उरण : कोकणामध्ये रयत शिक्षण संस्थेचे रोपटे ७० वर्षांपूर्वी अनेक शाळा-महाविद्यालयांच्या माध्यमातून कर्मवीर अण्णांनी लावले. आज त्याचे रूपांतर वटवृक्षात झाले आहे. रामशेठ ठाकूर, महेंद्रशेठ घरत यांच्यासारख्या असंख्य विद्यार्थांचे शिक्षण 'रयत'मुळे झाले. त्यामुळे आज ते यशाची शिखरे पादाक्रांत करीत असताना आपले आयुष्य 'रयत'मुळेच घडले हे न विसरता कोकणातील विद्यार्थी आपल्या विभागातील शाळा-महाविद्यालयांसाठी भरीव आर्थिक मदत करतात.तसेच पश्चिम महाराष्ट्रातील शाळा-महाविद्यालयांच्या इमारत बांधकामासाठीसुद्धा आर्थिक साह्य करीत आहेत. 'रयत'च्या माध्यमातून अण्णांनी शिक्षणाची गंगा आणून अशी माणसे पेरली की तीच आज समाजासाठी झटत आहेत असे म्हटले तर वावगे ठरू नये असे मत अहिल्यानगर जिल्ह्यातील रयत शिक्षण संस्थेच्या चिंचोटी पाटील येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या उदघाटनप्रसंगी माजी कृषिमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संस्थापक नेते शरद पवार यांनी व्यक्त केले. त्यांच्या हस्ते चिंचोटी पाटील येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयाच्या नूतन इमारतीचे उदघाटन रविवारी (ता. १६)झाले त्यावेळी ते बोलत होते.

चिचोंटी पाटील गाव अवर्षणग्रस्त भागात आहे त्यामुळे तेथील महाविद्यालयाचे काम रखडू नये म्हणून आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी आर्थिक साह्य केले. त्यामुळेच महेंद्रशेठ घरत यांचा शरद पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महेंद्रशेठ घरत म्हणाले, रयत शिक्षण संस्थेमधून मिळालेले संस्कार व उच्च दर्जाच्या शिक्षणामुळेच आमच्यासारखे लाखो गरीब विद्यार्थी शिकू शकले. मी आज आंतरराष्ट्रीय पातळीवर आयओएल, आयटीएफ संघटनांवर लीलया काम करतोय. हे केवळ 'रयत'मुळेच घडले म्हणूनच 'रयत'चे उत्तरदायित्व होण्यासाठी 'रयत'ला शक्य तेवढे आर्थिक साह्य करून खारीचा वाटा उचलत आहे मी माझे कर्तव्य करीत आहे. साहित्यिक आणि माजी विद्यार्थी डॉ. संजय कळमकर यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे (सातारा) व्हाईस चेअरमन भगीरथ शिंदे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार आशुतोष काळे, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, दरेकर नाना, माजी मंत्री बबनराव पाचपुते, राजेंद्र फाळके, नगरचे माजी सभापती प्रवीण कोकाटे, सरपंच शरद पवार, आप्पासाहेब पवार, फकिरा पवार आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक आबासाहेब कोकाटे यांनी केले तर आभार प्राचार्य सी. डी. शिंदे यांनी मानले.आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांनी आजपर्यंत अनेक ठिकाणी मदतीचा हात दिला आहे. सहकार्य केले आहे. त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

स्वानंद सार्वजानिक वाचनालया व आनंद तग्रमीण विकास प्रतिष्ठाण मध्ये जागतिक ग्राहक दिन, संत तुकाराम बीज, शहाजीराजे जयंती संपन्न



केज ■ प्रतिनिधी

केज : स्वानंद सार्वजनिक वाचनालय, व आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण,आनंदगांव ता. केज. जि. बीड येथे विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम आणि उपक्रम संपन्न. दिनांक १५ मार्च २०२५ रोजी ' जागतिक ग्राहक दिन ' साजरा करण्यात आला. ' ग्राहकांचे हक्क, अधिकार आणि कर्तव्य. ' या विषयावर 'परिसंवाद 'घेण्यात आला.

दिनांक १६ मार्च २०२५ रोजी ' जगदगुरु संत तुकाराम महाराज बीजोत्सव ' साजरा करण्यात आला. ' संत तुकाराम महाराज एक अद्वितीय महापुरुष व तुकाराम गाथा ' चा विषयावर . ' चर्चासत्र' घेण्यात आले.

दिनांक १८ मार्च २०२५ रोजी 'स्वराज्य संकल्पक छत्रपती शहाजी राजे भोसले' यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्व कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्रर्यालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक प्राचार्य डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.

विविध कार्यक्रमात प्रमुख पाहुणे व मागदर्शक म्हणून माजी सरपंच रामराजे गायकवाड, एस. के. वैरागे, अरुण गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, मुख्यमंत्रीदुत अमोल राऊत, हरिओम गायकवाड,संजय सोनवणे, मधुकर गायकवाड, आनंद गायकवाड यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

सर्व कार्यक्रम हे वेगवेगळया तारखेत झाले, सर्व कार्यक्रमांचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला तर सर्व कार्यक्रमाचे प्रस्ताविक, सुत्रसंचलन, आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे व संस्थेचे आनंद गायकवाड यांनी केले.

सात दिवसात पिकविम्याची अग्रीम रक्कम:शेतकरी हक्क मोर्चाचा रास्ता रोको मागे



परभणी ■ वसंत आवटे

परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२४ चा प्रलंबित पिक विम्याची अग्रीम रक्कम सात दिवसांच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे लेखी आश?वासन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दौलत चव्हाण यांनी दिले. शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने परभणी तालुक्यातील किन्होळा पाटीवर बुधवार १९ मार्च रोजी या मागणीसाठी भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात इशारा देण्यात आला होता. या पाश्र्वभूमीवर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दौलत चव्हाण, पोलिस निरीक्षक श्रीकांत डोंगरे, आयसीआयसीआय लोंबार्ड कंपनीचे जिल्हा प्रतिनिधी प्रशांत शिंदे, प्रकाश नव्हात्रे यांच्यासह आंदोलनकर्त्यांच्या संयुक्त बैठकीतून कृषि अधिकारी चव्हाण यांनी पिक विम्याची अग्रीम रक्कम येत्या सात दिवसांच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, अशी ग्वाही दिली. त्यामुळे नियोजित रास्तारोको आंदोलनकर्त्यांनी मागे घेतला, अशी माहिती शेतकरी हक्क मोर्चाचे हेमचंद्र शिंदे, विश?वंभर गोरवे, संतोष देशमुख, अर्जुन पाटील, भगवान दुधाटे, गोविंद गिरी, नितीन मोरे, जगदीश देशमुख, रावसाहेब मोकाशे, अरुण मुंडे, गंगाधर मुंडे, मानेश यादव, माधव घूमणर, उद्धव साबळे आदींनी दिली.

जेष्ठ इतिहासकार प्रा मा.म. देशमुख सरांच्या निधनामुळे बहुजन समाज पोरका झाला : बी एम पवार

तेलगाव ■ प्रतिनिधी

देशाचे खरे दुश्मन कोण? कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांचा खरा इतिहास बहुजन समाजाला सांगणारे जेष्ठ इतिहासकार प्रा मा.म. देशमुख सरांच्या दुःखद निधनामुळे तमाम बहुजन समाज एका विचारवंताला मुकला आहे अशा संवेदना सेवालाल सेना संस्थापक आणि ओबीसी नेते बी एम पवार यांनी व्यक्त केल्या आहेत.

या संदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात असे म्हटले आहे की, प्रा. मा. म. देशमुख सरांनी बहुजन समाजात जागृती झाली पाहिजे यासाठी परिवर्तन यात्रा काढुन प्रबोधन करण्याचे मोठे काम हाती घेतले होते, देशमुख सरांच्या विरोधात या ठिकाणच्या मुठभर लोकांनी प्रेतयात्रा काढल्या होत्या हे विसरून चालणार नाही.

कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांचा खरा इतिहास बहुजन समाजाला कळाला पाहिजे यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. देशाचे खरे दुश्मन कोण? मध्ययुगीन भारताचा इतिहास, शिवशाही या सह अनेक पुस्तके पुराव्यानिशी लिहिले होते त्यामुळे ते वादग्रस्त झाले होते एवढेच नव्हे तर त्यांच्या भाषणावर बंदी घालण्यात यावे अशी मागणी सनातन लोकांनी केली परंतु त्यावेळी बहुजन समाजातील हजारो तरुण देशमुख सरांच्या भोवती ढाल म्हणून उभे राहिले होते.

प्रा.मा.म.देशमख सरांच्या जहालवादी विचारांमुळे राज्यात नव्हे तर देशभरात लाखो अनुयायी निर्माण झाले आहेत हे विसरून चालणार नाही.देशमुख सरांच्या निधनामुळे राज्यातील बहुजन समाज हा एका विद्वान, इतिहास संशोधकाला कायमचा मुकला आहे,देशमुख कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सर्व सहभागी आहोत अशा संवेदना बी एम पवार यांनी व्यक्त केल्या आहेत.

वाढत्या उष्म्याने नागरिक हैराण, शरीरावर काय परिणाम होतो? काळजी काय घ्याल

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर



(पुणे) वाघोली : उन्हाळा सुरू होण्याआधीच उष्णतेने कहर केला आहे. जास्त उष्णतेमुळे विविध आरोग्य समस्या उद्भवू शकतात. उष्माघाताच्या कारणांमध्ये थकवा आणि गंभीर प्रकरणांमध्ये उष्माघात यांचा समावेश होतो.ज्यामुळे अवयव देखील निकामी होऊ शकतात. आणि त्यामुळे मृत्यू देखील होऊ शकतो. या अति उष्णतेमुळे शरीरात डिहायड्रेशन, चक्कर येणे आणि इतर अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात. यामुळे आरोग्य हळूहळू बिघडू लागते.

उष्माघातामुळे शरीर पिवळसर होते

जेव्हा शरीराचे तापमान नियंत्रित करण्यास संघर्ष होतो तेव्हा असे होते, ज्यामुळे जास्त घाम येणे, त्वचा पिवळसर होणे, स्नायूंमध्ये क्रॅप येणे, अशक्तपणा, चक्कर येणे, डोकेदुखी, मळमळ, उलट्या आणि बेशुद्ध होणे अशी लक्षणे दिसून येतात. जर त्यावर उपचार केले नाहीत तर ते उष्माघातात बदलू शकते.उष्माघात ही एक जीवघेणी स्थिती आहे ज्यामध्ये शरीराचे तापमान धोकादायकपणे वाढते. शरीराचे उच्च तापमान, गोंधळ, अस्वस्थता, अस्पष्ट बोलणे, झटके आणि कोमा ही लक्षणे आहेत.

उष्णतेमुळे, घामाद्वारे शरीरातून द्रव बाहेर पडतात, ज्यामुळे शरीरात पाण्याची कमतरता निर्माण होऊ शकते. डिहायड्रेशनमुळे चक्कर येणे, बेशुद्ध पडणे आणि मेंदूला पुरेसे रक्त मिळणे कठीण होऊ शकते.

- डॉ. कपिल जुमले, वाघोली, पुणे.

उष्णतेमुळे हृदय आणि मूत्रपिंडांवर दबाव येऊ शकतो आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी, मानसिक, श्वसन आणि मधुमेहाच्या समस्या यासारख्या समस्या आणखी बिकट होऊ शकतात. उष्णतेच्या लाटेत हृदय, फुफ्फुस, मूत्रपिंड किंवा मानसिक आरोग्याच्या समस्या असलेल्या लोकांना जास्त धोका असतो.

- डॉ. योगेश आहेर, खराडी, पुणे.

चला जापनीज भाषा शिकायला...कुठरे हायस्कूल मध्ये

सातारा कराड ■ उमेश यादव



हे विश्वची माझे घर,या उक्तीचा प्रत्यय येतो,रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल कुठरे येथे. कारण येथील येथील विद्यार्थी शिकत आहेत,चक्क जापनीज भाषा. इयत्ता पाचवी ते नववी मधील विद्यार्थी जापनीज भाषा लिहितात,वाचतात. जेणेकरून उच्च शिक्षणानंतर भारतातीलच परदेशी कंपन्यांमध्ये परदेशी भाषा शिक्षक, अनुवादक, दुभाषी, पर्यटन गाईड इत्यादी अनेक क्षेत्रात करिअरच्या संधी मिळवता येतील .यासाठी विद्यालयातील उपशिक्षक श्री हल्लोळी रमेश महादेव हे स्वतः जापनी शिकून सर्व विद्यार्थ्यांना मोफत जापनीज शिकवतात. जापनीज भाषेत हिरागाणा काथाकाना व कांजी या तीन लिपी आहेत. यातील हिरागाना लिपी विद्यार्थी लेखन वाचन करतात. तसेच सोपे संभाषण ही करतात. यामुळे शाळेच्या गुणवत्तेत तसेच पटसंख्येत वाढ झाली आहे.तसेच विद्यालयात कराड पाटण तालुक्यातील एकमेव शासकीय करियर समुपदेशन केंद्र कार्यरत आहे. यामार्फत इयत्ता नववीच्या पुढील सर्व विद्यार्थ्यांचे ई. टेस्ट कल चाचणी ,?प्टीट्यूड टेस्ट, भावनिक बुद्ध्यांक, सामाजिक बुद्धांक इत्यादी शासकीय मानसशास्त्रीय कसोट्या घेऊन इयत्ता दहावी नंतर काय ? याचे शास्त्रशुद्ध करिअर मार्गदर्शन मोफत केले जाते.तसेच अधिकृत योगा टीचर यांचे मार्फत विद्यार्थ्यांना मोफत योगा ही शिकवला जातो.प्राणायाम,आसने, शुद्धिक्रिया इत्यादींची माहिती दिली जाते.तसेच रयत शिक्षण संस्था सातारा ,कर्मवीर विद्या प्रबोधनी यांचे मार्फत चालवले जाणारे सर्व गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने उपक्रम विद्यालयात राबवले जातात. त्यामुळे अगदी गुढे ,ढेबेवाडी,तळमावले येथून ही विद्यार्थी विद्यालयात प्रवेश घेत आहेत.तरी आपल्या आपल्या पाल्याचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने आजच न्यू इंग्लिश स्कूल कुठे विद्यालयात आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करा.मर्यादित प्रवेश उपलब्ध आहेत. या सर्व उपक्रमामध्ये मार्गदर्शक साथ सौ.कविता शिरीष पाटील मुख्याध्यापिका तसेच सर्व सेवक वर्ग, सर्व कमिटी पदाधिकारी, ग्रामस्थ ,माजी विद्यार्थी संघ यांची मोलाची साथ आहे.

उमेद महिला मेळावा मोठ्या उत्साहात ; महिला सेंद्रिय शेती व पर्यावरणाचा जनजागृतीचा संदेश

सातारा कराड ■ राहुल पवार



सातारा कराड : आठ मार्च जागतिक महिला दिन औचित्य साधून कराड तालुक्यातील वडोली निळेश्वर येथील महिलांनी स्नेह मेळावा आयोजन केला होता निळेश्वर मंदिर येथे हा मेळावा घेण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या उमेद उपक्रमांतर्गत महिला सशक्तिकरण उपक्रम घेण्यात येत आहे बचत गटांच्या माध्यमातून महिलांना उद्योग व प्रशिक्षण व बचत गट माध्यमातून महिलांमध्ये आर्थिक उन्नती व स्वयंरोजगार निर्मितीसाठी हा उपक्रम घेण्यात येत आहे अनेक ठिकाणी महिलांनी स्वतः उद्योगधंदे निर्माण केले आहेत याचा आदर्श घेऊन गावातील महिलांनी पुढाकार घ्यावा व बचत गटाच्या माध्यमातून स्वयंरोजगार व उद्योजिका बनण्यासाठी प्रयत्न करावे यासाठी गावातील महिलांसाठी स्नेहभोजन व महिला मेळावा संपन्न करण्यात आला अशी माहिती बचत गट समन्वयक गीतांजली जगदाळे यांनी दिली यावेळी विशाल महाजन यांनी सेंद्रिय शेती व परसबाग याविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आला वडोली निळेश्वर येथील महिलांनी परसबाग उपक्रम सुरू केला आहे गावातील एकरी माता मंदिर परिसरात स्वाती पवार यांनी महिलांना स्वतःची जागा उपलब्ध करून परसबाग व वृक्षारोपण संगोपन यासाठी सहकार्य केले आहे बचत गटाच्या माध्यमातून व महिलांच्या पुढाकारांनी उपक्रम घेण्यात आला आहे यावेळी महाजन म्हणाले सेंद्रिय शेती काळाची गरज आहे रासायनिक खताचा वापर शेतामध्ये जास्तीत जास्त प्रमाणात होत आहे त्यामुळे विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे यासाठी आपण महिलांनी पुढाकार घेतला तर परसबाग उपक्रम यशस्वी होऊ शकतो आपल्या गावचे व आपले आरोग्य उत्तम राहू शकते असे मत त्यांनी व्यक्त केले पंचायत समिती कृषी विभाग पूनम जाधव कृषी विज्ञान केंद्र कालावडे विशाल महाजन ग्रामसेवक पुष्पा कोळी सरपंच भीमराव मदने उपसरपंच संभाजी पवार अर्चना पवार सुलोचना पवार चेअरमन सुनील पवार रवी जगदाळे गणपत कुंभार राणी चव्हाण अर्चना इंगवले गीतांजली जगदाळे संगीता पवार यांची उपस्थिती होती प्रस्ताविक स्वाती शिंदे आभार पद्मिनी कुंभार यांनी व्यक्त केले.

कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयामध्ये जागतिक ग्राहक हक्क दिन साजरा

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे



उरण : कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयांमध्ये जागतिक ग्राहक हक्क दिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन आजीवन अध्ययन व विस्तार विभागा मार्फत करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. पी. आर. कारूळकर यांनी केले. विद्यार्थ्यांनी आपल्या व्यवहारिक जीवनामध्ये विक्रेत्याकडून काही फसवणूक होत असल्यास ते निमूटपणे सहन न करता त्याच्यावरती दाद मागितली पाहिजे. ग्राहकांचे हक्क आणि जाणीव याविषयी आपण जागृत राहिले पाहिजे असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या प्रस्तावनानंतर महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सरस्वती प्रार्थना गायली. महाविद्यालयाचे काही विद्यार्थी त्यामध्ये खुशी शर्मा, मोहिते तनिषा, घमरे तनवी, गुप्ता अंजली आणि चव्हाण साक्षी या विद्यार्थिनींनी जागतिक ग्राहक हक्क दिवसाच्या निमित्ताने आपली मनोगते व्यक्त केली. सदर मनोगते मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमधून अतिशय उत्कृष्टपणे मांडली होती.यानंतर डॉ.एच.के.जगताप यांनी जागतिक ग्राहक हक्क दिवसाचे महत्त्व आणि आपल्या जबाबदाऱ्या याविषयी मनोगत व्यक्त केले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.जी.लोणे यांनी ग्राहकांची कशी फसवणूक होते, आणि ती आपण कशी टाळली पाहिजे याच्या विषयी मार्गदर्शन केले. यानंतर आयोजक आजीवन शिक्षण विभागाचे प्रमुख ज्येष्ठ प्रा. व्ही. एस. इंदुलकर यांनी आभार व्यक्त केले.आभार व्यक्त करताना त्यांनी ग्राहकांच्या जबाबदाऱ्या, ग्राहकांनी कोणत्या प्रकारे वस्तू खरेदी कराव्यात, होणारी आपली पिळवणूक कसे थांबवावे याविषयी जागृती होण्यासाठी अशा प्रकारचे कार्यक्रम आपण नेहमी ऐकत राहिले पाहिजे. तसेच ग्राहकांचे हक्क आणि जबाबदाऱ्या, सामाजिक जनजागृती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमामध्ये प्रा. आर. टी. ठवरे प्रा. जे.के. कोळी प्रा. हन्नत शेख, प्रा. पूजा गुप्ता, प्रा. निलोफर मॅडम इत्यादी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरती पाटील या विद्यार्थिनीने सुरेख आणि उत्कृष्ट केले.

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत 'जॉर्ज ओहम' भौतिक शास्त्रज्ञाची जयंती साजरी

केज ■ प्रतिनिधी



केज: 'जॉर्ज ओहम' या भौतिक शास्त्रज्ञाच्या प्रतिमेस या शाळेतील आदर्श शिक्षिका श्रीमती गिताताई अंडील मॅडम व राजाभाऊ कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी यांनी पुष्पहार अर्पण करून पुजन केले.जॉर्ज ओहम हे बव्हेरियन- जर्मनीतील भौतिक शास्त्रज्ञाचा जन्म १६ मार्च १७७९ रोजी झाला.ते गणित तज्ञ होते.त्यांनी विद्युतरासायनिक घटावर संशोधन केले.हा ओहमचा नियम म्हणून प्रसिद्ध आहे.कोणत्याही डीसी इलेक्ट्रिकल सर्किटमधील व्होल्टेज,करंट,रेझिस्टन्स यांच्यातील संबंध सर्वप्रथम ओहम यांनी शोधून काढले.असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक राजाभाऊ कदम यांनी सांगितले.या शाळेतील शिक्षक बाळासाहेब राठोड सर, श्रीमती गिताताई अंडील मॅडम, शिक्षिका श्रीमती सोनाली भुमकर मॅडम यांनी सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बाळासाहेब राठोड सर यांनी केले.शेवटी श्रीमती गिताताई अंडील मॅडम यांनी आभार मानले.

नागपूरच्या दंगलीत एकाच घरातील पाच तरुण पोलिसांच्या ताब्यात

नागपूर ■ प्रतिनिधी



नागपूर : सोमवारच्या दंगलीनंतर मध्य नागपुरातील चिटणवीसपुरा चौक, महाल आणि आसपासपच्या परिसरात तणावपूर्ण शांतता आहे. संचारबंदी बुधवारी देखील कायम असून भालदारपुऱ्यातील युवकांना संशयित म्हणून ताब्यात घेण्याची मोहीम मोठ्या प्रमाणात राबवण्यात आली. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलातर्फे नागपुरातील महाल, गांधी गेटजवळील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर सोमवारी आंदोलन करण्यात आले. यावेळी औरंगजेबचा प्रतिकात्मक पुतळा आणि चादर जाळण्यात आली. त्यानंतर मध्य नागपुरात दोन गटात तणाव निर्माण झाला आणि त्याचे रुपांतर दंगलीत झाले.

पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी नागपुरातील ११ पोलीस ठाण्याच्या हद्दीत संचारबंदी सोमवारी रात्रीपासून जाहीर केली. बुधवारी देखील संचारबंदी कायम असून दंगलीतील संशयितांना पडकण्याची शोध मोहीम राबण्यात येत आहेत. भालदारपुरा येथील एकाच कुटुंबातील पाच युवकांना ताब्यात घेण्यात आले. यातील काही युवक अल्पवयीन होते. यासंदर्भात बोलताना माजी नगरसेवक फिरोज खान म्हणाले, दंगल करणारे लोक पळून गेले. पण, आता निष्पाप युवकांना पोलीस ताब्यात घेत आहे. त्यांना केवळ चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आल्याचे पोलीस सांगत असलेतरी पोलिसांची आजवरची कार्यपद्धती बघता त्या युवकांना गुन्हे दाखल केले हे निश्चित. याबाबत पोलीस उपायुक्त राहुल मदने यांनी युवकांना केवळ चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आल्याचे लोकसत्ताला सांगितले.

दरम्यान, आज महाल, चिटणीसपुरा चौक, भालदारपुरा, बडकस चौक, इतवारी सराफा बाजार, इतवारीतील किरणाओळी, गांधीबाग, गोळीबार चौक, मोमीनपुरा, टिमकी, हंसापुरी, जुना भंडारा रोड, तीन नळ चौक, गितांजली चौक, इतवारी दहीबाजार, शांतीनगर, सतरंजीपुरा, शांतीनगर, कसाबपुरा, डोबीनगर, इतवारी बाजार या मध्य नागपुरातील जुन्या बाजारपेठा आणि लोकवस्तीमध्ये संचारबंदी कायम आहे. या भागातील औषधाची दुकाने आणि रुग्णालय वगळता सर्व दुकाने बंद आहेत. या भागात दुचाकी आणि चारचाकी वाहनांना प्रवेश नाही.

जमावबंदी आदेश लागू असल्याने महाल, गांधी गेट, शिवाजी पुतळा, जुना फवारा चौक, चिटणीसपुरा चौक या भागात कटेकोट पोलीस बंदोबस्त आहे. या भागात कोणालाही प्रवेश नाही. परंतु स्थानिक नागरिकांना पायदळ फिरण्यास पोलिसांनी परवानगी दिली आहे. केवळ एकत्रित येण्यास मज्जाव करण्यात आला आहे. सेंट्रल ?व्हेन्यूवरील वाहतूक सुरू आहे. मेट्रो देखील सुरू आहे. शहरात भालदरापुरा, हंसापुरी, मोमीनपुरा, बडकस चौक, चिटणीसपुरा चौक, गांधी गेट, महाल येथे तणावपूर्ण शांतता आहे. महाल, इतवारी, गांधीबाग, लकडगंज, कोतवाली या परिसरातील बाजारपेठा कडे जाणाऱ्या सर्वच रस्त्यावर पोलिसांनी बॅरिकॅडिंग केली आहे. गांधी गेट, महाल चिटणीस पार्क चौक यासह अन्य भागात पोलिसांनी मोठ्या प्रमाणात सुरक्षा दलाचे जवानाना तैनात केले आहे. शहरातील मध्य नागपूर विधानसभा मतदारसंघातील या काही निवडक लोकवस्त्या वगळता नागपूर शहरात इतरत्र सामान्य जीवन आहे.

सेलू चा तीर्थक वरठी याची राष्ट्रीय चॉकबॉल स्पर्धेकरिता निवड



सेलू ■ प्रशांत झाडे

सेलू : नुकत्याच २८ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत गोंदिया येथे राज्यस्तरीय चॉकबॉल स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत तीर्थक हा वर्धा संघाचा कर्णधार म्हणून खेळला आणि उत्तम कामगिरी त्यांनी या स्पर्धेत केली. स्पर्धेला निवड समिती अध्यक्ष करण गवळी याने तीर्थक वरठी याची निवड शिर्डी येथे होणाऱ्या सब ज्युनिअर राष्ट्रीय चॉकबॉल स्पर्धेकरिता महाराष्ट्र संघात केली. तीर्थक हा सेलू येथे क्रीडा संकुल मैदानावर नियमित खेळाचा प्रशिक्षण शौर्य स्पोर्ट्स अकॅडमी मध्ये घेतो. त्याने आपल्या यशाचे श्रेय आपल्या पालकांना ,चॉकबॉल असोसिएशन चे सचिव अनंत भाकरे सर यांना व त्याचे प्रशिक्षक अजहर शेख ,करण चौहान ,साहिल कुमरे यांना दिले. राकेश बोंद्रे, मंगल जगताप, सोहेल पठाण ,रोशन शिंदे, आशिष काळे, सुमित तळवेकर ,राजेंद्र राठोड, आसिफ पठाण ,रीतीकेश बावनकुळे, अखिल फुलमली, बदल ढोबळे, सुजल पोइणकर, यश राऊत, प्रणव वाढवे, अनमोल नगराळे, ओम अमझरे, विनायक गिरीपुंजे ,हर्षल ठाकूर, गौरव करंगळे, तोहीर शेख ,प्रज्वल येंडे, साई तिमांडे, वेदांत माहुरे, नक्ष नंदनवार, व सर्व खेळाडूंनी तीर्थक चे अभिनंदन केले. खेळाडूवर सर्वतफे शुभेच्याच वर्षाव सुरू आहे .

वाळू तस्करीः महसूलमंत्र्यांचे विभागीय चौकशी आदेश धडकले ; मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता

भंडारा ■ प्रतिनिधी

भंडारा : तुमसर तालुक्यातील वैनगंगा व बावनथडी नदीची वाळू उच्च गुणवत्तेची आहे. तिला मोठी मागणी असल्याने तस्करांनी नवीन शक्कल लढवून तंत्रज्ञानालाही आव्हान दिले आहे. वाळू वाहतुकी दरम्यान घाटापासून वाहतूक करणाऱ्या वाहनाला जिओ टॅगिंग लावणे गरजेचे आहे. ते दुचाकीला लावून ती महाराष्ट्राच्या सीमेत आणणे व त्यानंतर येथील ट्रक व टिप्परला हे जिओ टॅगिंग लावून नागपूर येथे वाळू नेली जात आहे. हा प्रकार मागील कित्येक महिन्यापासून सुरू आहे. हा प्रकार आमदार नाना पटोले यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात उचलल्यानंतर राज्याच्या महसूल मंत्र्यांनी विभागीय चौकशीचे आदेश दिले. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. या वाळू चोरी प्रकरणात कॉल रेकॉर्ड सीडीआर तपासणी होणार असल्याने मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अशी होते आंतरराज्य रेती चोरी

महाराष्ट्र व मध्यप्रदेशाच्या सीमा लागून आहेत. वैनगंगा व बावनथडी या दोन्ही नद्या दोन्ही राज्याच्या सीमेतून वाहतात. मध्यप्रदेशात वाळू घाटांचा लिलाव करण्यात आला आहे. परंतु राज्याच्या सीमेतील घाटांच्या लिलाव न करता शासकीय वाळू डेपो सुरू करण्यात आले. यामध्ये तुमसर तालुक्यातील उमरवाडा, पांजरा (रेंगेपार), मांडवी, सोंड्या, चारगाव, लोभी, आष्टी या सात डेपोच्या समावेश आहे. मात्र उमरवाडा डेपोला पर्यावरण विभागाची परवानगी नसल्याचे सांगितले जात आहे. तसेच तालुक्यातील इतर अनधिकृत रेती बावनथडी व वैनगंगा नदीपात्रातून उपसा सुरू आहे. वाळू वाहतुकीकरिता रॉयल्टी अनिवार्य आहे. मध्यप्रदेशातील घाटावर जाण्याकरिता ट्रक व टिप्परला मोठा खर्च करावा लागतो. त्यामुळे तस्करांनी तुमसर तालुक्यातील वाळू ट्रक व टिप्पर मध्ये भरणे सुरू केले.

दुचाकीला जिओ टॅगिंग

रेतीचे वाळू व टिप्पर मध्यप्रदेशात न जाता ते महाराष्ट्राच्या सीमेतच थांबायचे. मध्यप्रदेशातील घाटातून दुचाकीला जिओ टॅगिंग लावून ती महाराष्ट्राच्या सीमेत आणण्यात येत आहे. त्यानंतर दुचाकीची जिओ टॅगिंग रेती वाहतूक करणाऱ्या ट्रक व टिप्परला लावण्याच्या गोरखधंदा येथे केला जात होता.

विधानसभेत चर्चेनंतर खळबळ

सोमवारी विधानसभेत आमदार नाना पटोले यांनी तुमसर तालुक्यातील वाळू प्रकरणाबाबत लक्षवेधी मांडली. आमदार पटोले यांनी तुमसर तालुक्यातील महसूल अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले. त्यानंतर महसूलमंत्र्यांनी या सर्व प्रकाराची विभागीय चौकशी करण्याचे आदेश दिले. कॉल रेकॉर्ड सीडीआर तपासणीच्या धास्तीने येथील महसूल प्रशासनात मोठी हालचाल दिसत आहे. शासनाच्या महसूल विभागाचे अधिकारी यांचे आदेश येथे धडकल्याने तुमसर तहसील कार्यालयात कागदपत्रांची जुळवाजुळव करताना अधिकारी व्यस्त दिसले. सध्या तुमसर शहरातून जाणाऱ्या आंतरराज्य मार्गावर वाळू ट्रक व टिप्पर यांची वाहतूक नगण्य दिसली. या खेळात आता कुणाचा बळी जाणार याची चर्चा तुमसर येथे सुरू आहे.

महसूल प्रशासनाला १३ कोटींचे लक्ष्य

१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत येथील महसूल प्रशासनाला १३ कोटींच्या महसूल जमा करण्याचे लक्ष्य देण्यात आले होते.

हिंदू परिषदेचे कार्यकर्ते पोलीस ठाण्यात हजर; दोन तासात जामीन

नागपूर ■ प्रतिनिधी



नागपूर : विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्यावतीने सोमवारी दुपारी पोलिसांकडून रितसर परवानगी घेऊन छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचा कार्यक्रम महाल-गांधीगेट समोर घेण्यात आला. त्यानंतर औरंगजेबची प्रतिकात्मक कबरीवर हिरवी चादर टाकून जाळण्यात आली. या घटनेमुळे दंगळ उसळली. या प्रकरणी गणेशपेठ पोलिसांनी गुन्हे दाखल केले होते. बुधवारी दुपारी चार वाजता विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाचे आठ कार्यकर्त्यांनी कोतवाली पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. त्यांना पोलिसांना आज न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांची जामीनावर सुटका केली.

विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्यावतीने राहुल प्रमोद नारनवरे (आयोजक) यांनी महालमधील गांधीगेटसमोर छत्रपती शिवाजी महाराजांची जयंतीचा कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना माल्यार्पण केले. या कार्यक्रमासाठी विश्व हिंदू परिषदेने पोलिसांकडून रितसर परवानगी घेतली होती.

नागपुरातील महिला पोलिसाचा विनयभंग उपसभापतींकडून तातडीने चौकशीचे आदेश

मात्र, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयतीच्या कार्यक्रमानंतर विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाचे कार्यक्रते गोविंद शेंडे, अमोल ठाकरे, डॉ. रामचंद्र दुबे, सुशिल चौरसीया (सेवा प्रमुख), वृषभ अरखेल (सहसंयोजक), शुभम अरखेल (सेवाप्रमुख), मुकेश बारापात्रे (मध्यनागपूर अध्यक्ष) कमल हरियानी (संयोजक), लखन कुरील (विदर्भ सहप्रमुख) यांनी औरंगजेबचे छायाचित्राला जोडे मारण्याचा आणि जाळण्याचे ठरविले.

त्यानंतर त्यांनी औरंगजेबची प्रतिकात्मक कबर तयार करुन त्यावर मुस्लीम धर्मात पवित्र मानली जाणारी हिरव्या रंगाची चादर टाकून कबर जाळली. हा सर्व प्रकाराचे मोबाईलने व्हिडिओ आणि फोटो काढून सोशल मीडियावर व्हायरल केले. दुपारी चार वाजताच्या सुमारास मायनॉरिटी डेमोक्रॅटीक पक्षाचे शहरअध्यक्ष फहीम खान शमीम खान याने ४० ते ५० युवकांचा जमाव गणेशपेठ पोलीस ठाण्यात नेला.

तेथे हिरवी चादर जाळून मुस्लीमांच्या धार्मिक भावना दुखावल्यामुळे गुन्हे दाखल करुन आरोपींना अटक करण्यासाठी तक्रार देण्यात आली. गणेशपेठ पोलिसांनी हा प्रकार गांभीर्याने घेतला नाही. त्यामुळे युवकांनी संताप व्यक्त करीत पोलीस ठाण्याला घेराव घालण्याचा प्रयत्न केला. सायंकाळी पोलिसांनी या प्रकरणी गुन्हे दाखल केले. मात्र, त्यांना ताब्यात न घेतल्यामुळे फहीम खान याने नाराजी व्यक्त केली होती. सायंकाळी अचानक दोन्ही गट आमने सामने आले दगडफेक सुरु झाली. या प्रकरणी पोलिसांनी तीन पोलीस ठाण्यात सहा गुन्हे दाखल केले असून १२५० संशयित आरोपींवर गुन्हे दाखल केले आहेत. बुधवारी दुपारी विश्व हिंदू परिषदेचे आठ कार्यकर्ते कोतवाली पोलीस ठाण्यात हजर झाले. त्यांना पोलिसांनी अटक केली. त्यांना न्यायालयाने दोन तासांत जामीनावर सुटका केली.

सावधान! ऐन उन्हाळ्यात पावसाचा अंदाज, 'या' ठिकाणी मेघ गर्जनेसह वीज

बुलढाणा ■ प्रतिनिधी



बुलढाणा : यंदाच्या उन्हाळा चांगलाच तापत आहे. तापमान चाळीस अंशावर वाटचाल करीत असताना उद्या गुरुवारी (२०मार्च) पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. सध्या दंगलीने तापलेल्या नागपूर येथील प्रादेशिक हवामान केंद्राने हा अंदाज वर्तविला आहे. प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर प्राप्त हवामान अंदाजानुसार बुलढाणा जिल्ह्यात उद्या २० मार्च रोजी तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आला आहे.

एवढेच नव्हे तर मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता देखील वर्तविण्यात आली आहे. अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अंतर्गतच्या येथील कृषी विज्ञान केंद्राने ही माहिती दिली. येथील शास्त्रज्ञ मनेश यदुलवार यांनी वादळी वाऱ्याची व मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याचे सांगितले. डॉ. यदुलवार यांनी जिल्ह्यातील शेतकरी आणि पशुपालक यांना खबरदारी घेण्याचा सल्ला दिला आहे. कापणी, मळणी केलेला शेतमाल ताबडतोब सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा, जनावरांना खराब हवामान परिस्थितीत सुरक्षित ठिकाणी बांधून ठेवावे अशी सूचना त्यांनी दिली आहे.

ढगाळ वातावरण

हा अंदाज काहीसा अचूक ठरण्याची चिन्हे आज बुधवारी, १९ मार्च रोजी दिसून आली. आज दुपारपासूनच बुलढाणा शहरासह जिल्ह्यात बहुतेक ठिकाणी ढगाळ वातावरण तयार झाल्याचे दिसून आले. सध्या बुलढाण्यासह घाटावरील सहा तालुक्यात कमाल तापमान ३७ ते ३८ डिग्री सेलसियस तर घाटा खालील सात तालुक्यातील कमाल तापमान ४० डिग्री च्या आसपास रेंगाळत आहे. उद्योग नगरी खामगाव शहरातील तापमान ४१ डिग्रीच्या आसपास आहे. आज दुपारपासून असलेल्या ढगाळ वातावरण मुळे तापमानात घाट होण्याची शक्यता आहे. यात उन्हाळा चांगलाच तापत असताना उद्या गुरुवारी अवकाळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

शिवसेना (उबाठा)शाखा साहुरच्या वतीने शिवजयंती उत्सव साजरा



साहूर ■ शरद वरकड

साहुर : आष्टी तालुक्यातील साहुर येथे शिवसेना उबाठा शाखा साहुरच्या वतीने मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आली यावेळी उपस्थित सर्व शिवसैनिकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले तसेच लाहान चिमुकल्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करुन आपले मनोगत व्यक्त केले यावेळी शिवसेना शाखा साहुरचे पदाधिकारी व आष्टी पोलिस स्टेशनचे होमगार्ड उपस्थित होते शिवसेना शाखा प्रमुख विजय गावंडे, छगन ढोरे, प्रवीण मोहिते, शाम शिंके, राजु शिंदे, सुचक बनगाडे , प्रवीण धांदे, प्रफुल मुंदाने, रोषन घारे, शरद वरकड, संदेश बनगाडे उपस्थित होते तसेच आष्टी पोलिस स्टेशनच्या वतीने होमगार्ड अतुल कापडे , मंगेश सोनोने , राहुल कपडे, संगिता रामटेके आपली प्रामाणिक कर्तव्य बजावत होते.

सालेभाटात बिबट्याचा थरार: ६ शेळ्यांचा बळी, वनविभागाची तत्पर कारवाई

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडारा : भंडारा - सालेभाटा (ता. लाखनी) येथे रविवारी पहाटे बिबट्याने धुमाकूळ घालत प्यारेलाल मोडकू रहांगडाले यांच्या ६ शेळ्यांचा फडशा पाडला. सकाळी ६ वाजताच्या सुमारास हा हल्ला झाल्याचे समजताच वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

वनपरिक्षेत्र अधिकारी एस. पी. गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली जे. एम. बघेले (क्षेत्र सहाय्यक), कु. टी. जी. गायधने (बीटरक्षक लाखनी), लखवाल (बीटरक्षक गडेगाव), बोरकर (बीटरक्षक रामपुरी) आणि मदतनीस मयूर गायधने यांनी मृत शेळ्यांची पाहणी करून पंचनामा नोंदवला. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. देशमुख (लाखनी) आणि डॉ. कापगते (लाखोरी) यांनीही घटनास्थळी भेट देऊन चौकशी केली.

घटनेची गंभीरता लक्षात घेता गावातील प्रतिष्ठित नागरिकांसह प्रशासनाने पुढील उपाययोजनांवर चर्चा केली. सरपंच खुमेश बोपचे, पोलीस पाटील संजय बोपचे, भगतजी व इतर ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते. शेळी मालकाने मृत शेळ्यांना दफन केले असून, गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. वनविभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

अमरावती विमानतळाला डॉ. पंजाबराव देशमुखांचे नाव द्या

अमरावती ■ प्रतिनिधी



अमरावती : बेलोरा येथील विमानतळाच्या नामकरणाचा मुद्दा आता तापला असून या विमानतळाला डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे, दर्शनी भागात डॉ. पंजाबराव देशमुख यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, यासह अन्य मागण्यांसाठी बुधवारी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. फुले, शाहू, आंबेडकर, भाऊसाहेब देशमुख फाउंडेशनच्या वतीने माजी कुलगुरू डॉ. गणेश पाटील, फाउंडेशनचे समन्वयक किशोर बोरकर, डॉ .बी.आर.देशमुख, ?ड गजानन पुंडकर, ?ड पी.एस खडसे, डॉ. श्रीकांत देशमुख, भैय्यासाहेब निचळ, प्राचार्य गोपीचंद मेश्राम, रामेश्वर अभ्यंकर, समीर जंवजाळ प्रा. सुजाता झाडे, प्रा. प्रदीप दंदे, यांच्या नेतृत्वात ही निदर्शने करण्यात आली आणि मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात आले.

अमरावती विमानतळाला डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे, यासाठी विविध सामाजिक संघटना गेल्या चार ते पाच वर्षापासून मागणी करीत आहेत. तसेच अमरावती जिल्हा परिषदेने व महापालिकेने सर्वानुमते ठरावही पारित केला असल्याचे निवेदनात म्हटले आहे. १३ जुलै २०१९ रोजी बेलोरा विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या प्रसंगी तत्कालीन आमदार डॉ. सुनील देशमुख यांच्या नेतृत्वात बेलोरा विमानतळाला डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे या मागण्यांचे निवेदन तत्कालीन मुख्यमंत्री व विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन देण्यात आले आहे. विमानतळाला डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे त्यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे, बेलोरा विमानतळावरून अमरावती मुंबई, पुणे व दिल्ली प्रवासी वाहतूक सुरू करण्यात यावी या मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले.

आंदोलनात प्रा. अनिल देशमुख, राजाभाऊ चौधरी, संकेत पाटील, नरेशचंद्र काठोळे, अंजली ठाकरे, अश्विनी चौधरी, समाधान वानखडे, चंद्रकांत मोहिते, रामेश्वर अभ्यंकर, जगदीश गोवर्धन, हेमंत देशमुख, प्रदीप राऊत विविध संस्थांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

भाऊसाहेबांच्या राष्ट्रीय कार्याची दखल घ्यावी - किशोर बोरकर

पंजाबराव देशमुख देशाचे पहिले कृषिमंत्री असताना शेतकऱ्यांना मदत व्हावी व त्यांचा विकास व्हावा म्हणून देशांतर्गत कृषक समाजाची स्थापना केली देशभरात भाऊसाहेबांना मानणारा वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. भाऊसाहेब देशमुख यांच्या राष्ट्रीय कार्याची दखल घेऊन बेलोरा अमरावती विमानतळास डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे अशी प्रतिक्रिया शाहू फुले आंबेडकर भाऊसाहेब देशमुख फाउंडेशनच्या समन्वयक किशोर बोरकर यांनी दिली.

दंगलीमुळे किराणा, खाद्यवस्तूंचा तुटवडा; कर्फ्युमुळे आठवड्यातील दुकाने बंद

नागपूर ■ प्रतिनिधी

नागपूर : नागपुरात सोमवारी (१७ मार्च २०२५) दोन धार्मिक गटांत संघर्ष पेटल्यामुळे महाल, इतवारीसह परिसरात तणाव कायम आहे. तणावामुळे इतवारीतील किराणा ओळी सलग दोन दिवसांपासून बंद असल्याने शहरातील विविध भागातील किरकोळ दुकानात किराणा, खाद्यवस्तूंचा तुटवडा जाणवत असल्याचा दावा नागपूर चिल्लर किराणा व्यापारी संघाने केला आहे.

नागपुरातील किराणा ओळीत मोठ्या संख्येने ठोक दुकानांसह त्यांचे गोदामही आहेत. या ठोक दुकानदारांकडून नागपूरसह विदर्भातील विविध जिल्ह्यात किराणा खाद्यवस्तुंचा नियमित पुरवठा होतो. दरम्यान नागपुरातील महाल परिसरात सोमवारी रात्री (१८ मार्च) दोन धार्मिक गटात संघर्ष पेटल्यावर जमावाकडून कुऱ्हाडी, रॉड, दगडासह मिळेल त्या वस्तूने पोलिसांसह सामान्य नागरिकांवरही हल्ला केला गेला. तर दुसरीकडे अनेक वाहने पेटवत घरातही शिरण्याचा प्रयत्न केल्यावर शहरातील महाल, इतवारी, हंसापुरीसह परिसरात तणाव आहे.

दरम्यान पोलिसांनी काही भागात संचारबंदी तर काही भागात जमाबंदीही लागू केली आहे. त्यामुळे नागपुरातील किराण्याचा ठोक बाजार दोन दिवसांपासून बंद आहे. याचा फटका शहरातील किराणा खाद्यपदार्थाच्या पुरवठ्यावरही होत आहे. नागपूर चिल्लर किराणा व्यापारी संघाचे महासचिव ज्ञानेश्वर रक्षक म्हणाले, नागपूर शहर आणि ग्रामीण भागाला ठोक किराणा, जिवनावश्यक खाद्यपदार्थ व वस्तुंचा पुरवठा इतवारी बाजारातून होतो. परंतु हा बाजार हिंसाचारामुळे दोन दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे शहरातील किरकोळ किराणा दुकानात खाद्यवस्तुंचा तुटवडा भासत आहे. हे बाजार आणखी बंद पडल्यास स्थिती बिघडण्याचा धोका आहे. परंतु दुकान उघडल्यास तेथे लुटीसह अनुचित प्रकार घडण्याचा धोका नकारता येत नाही. त्यामुळे शहरातील राजकीय, सामाजिक, व्यापाऱ्यांनी एकत्र येऊन किराणा बाजारातील संचारबंदीबाबत चिंतन करावे. जेणेकरून पुन्हा पुरवठा सुरळीत होईल, असेही रक्षक म्हणाले.

प्रकरण काय ?

नागपुरातील महाल परिसरात एका गटातील युवकांनी पोलिसांवर दगडफेक केली. प्रत्युत्तरात पोलिसांनीही त्या गटावर अश्रुधुराच्या नळकांड्या फोडून जमाव पांगावला. हा सर्व प्रकार सोमवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास घडला. याचा परिणाम शहरातील सामान्य जनजीवनावर झालेला आहे. शहराच्या काही भागात संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे. पोलिसांनी महाल- गांधी गेटकडे जाणाऱ्या सर्वच रस्त्यावर 'बॅरिकेडींग' करून मार्ग बंद केले आहे. तर काही भागात जमावबंदीही लागू करण्यात आली आहे. दरम्यान या संचारबंदी व जमावबंदीमुळे इतवारीतील किराणा ओळी परिसरातील किराणाचे सर्व ठोक बाजार बंद आहेत. त्यामुळे शहरात किराणा खाद्यवस्तुंचा तुटवडा जाणवतो आहे.

जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्यांची पडणार खाट, सरकारने लागू केले नवे नियम

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : बिहार राज्यात आता जमीन हडपणाऱ्यांवर पोलीस कडक कारवाई करणार आहेत. महसूल आणि जमीन सुधारणा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कुमार यांनी गृह विभागाला पत्र लिहून याबाबतीत ज्या सूचना दिल्या आहेत. त्या अंतर्गत, जर एखाद्या व्यक्तीने एखाद्याच्या जमिनीवर किंवा मालमत्तेवर बेकायदेशीरपणे कब्जा केला तर त्याच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता (बीएनएस) कलम ३२९ अंतर्गत गुन्हा दाखल केला जाईल. अशा प्रकरणांमध्ये तातडीने कारवाई करून पीडित पक्षाला दिलासा देण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या आहेत.

पोलिसांनी कारवाई करावी

दीपक कुमार यांनी त्यांच्या पत्रात असेही ठासून सांगितले आहे की, जमीन वादाच्या प्रकरणांमध्ये पोलीस अनेकदा हलगर्जीपणा दाखवतात. परंतु आता तसे न करता अशी प्रकरणे गांभीर्याने घेऊन दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, असे निर्देश त्यांनी जिल्हा दंडाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना दिले आहेत.

अपर मुख्य सचिव म्हणाले की, गुंड आणि भूमाफिया कमकुवत लोकांच्या जमिनी हडप करतात, असे अनेकदा दिसून आले आहे. अशा प्रकरणांमध्ये पीडित पक्षाला न्यायालयात जावे लागते. ते आता यापुढे होता कामा नये, असे कठोरपणे सांगत, जमीन हडपणाऱ्यांवर पोलिसांनी स्वतःहून कठोर कारवाई करावी, असे निर्देश दिले आहेत.

पोलिसांनी अटक करावी

ते पुढे म्हणाले की, जर कोणी शस्त्राच्या बळावर जमिनीवर कब्जा केला असेल तर त्याला तात्काळ अटक करून त्याच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम १२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात यावा. अशा लोकांना जामीन मिळू नये. त्याला तीन वर्षांसाठी जातमुचलक्यावर ठेवण्याचे आदेश दिले जाऊ शकतात.

दीपक कुमार असंही म्हणाले की, जमीन वादाची प्रकरणे सोडविण्यासाठी जिल्हा स्तरावर साप्ताहिक बैठका आयोजित केल्या जातात. परंतु, अनेकदा या बैठकांमधून कोणतेही ठोस परिणाम साध्य होत नाहीत. या बैठका अधिक प्रभावी कराव्यात आणि जमिनीच्या वादाची प्रकरणे लवकरात लवकर निकाली निघावीत, याची काळजी घेण्याचेही त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले आहे.

ॅच अंतर्गत कारवाई

जमीन वादाची प्रकरणे इतर फौजदारी प्रकरणांप्रमाणेच गांभीर्याने घेतली पाहिजेत, असे ते म्हणाले. पोलिसांनी अशा प्रकरणांमध्ये (बीएनएस)च्या कलम ३२९ आणि भारतीय दंड संहितेच्या कलम १२६ नुसार कारवाई करावी. दीपक कुमार म्हणाले की, जमिनीच्या वादात अनेकदा पीडित पक्षाला धमकावले जाते. अशा प्रकरणांमध्ये पीडित पक्षाला सुरक्षा पुरवण्याची व्यवस्था करावी, असेही त्यांनी पोलिसांना सूचित केले आहे. एकूणच बिहार सरकारने जमिनी व मालमत्तेच्या अतिक्रमण वादाविषयी घेतलेला हा निर्णय स्तुत्य असून तो निर्णय देशभरात सर्वत्र लागू झाल्यास महाराष्ट्र राज्यातील अनेक पीडित पक्षाला न्याय मिळवणे सोपे जाईल एवढे निश्चित !

या राज्यात जमिनीसंदर्भातील नियमांमध्ये मोठा बदल करण्यात आला असून, आता जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्यांची खाट पाडली जाऊन आता त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येणार आहे.

'गावात नळ , आणि पाण्याचा लळ'' ही म्हण सार्थ ठरविते ''शिंगोरी कोकनागड चांदोरी'' गट ग्रामपंचायत !

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडारा : शिंगोरी - भंडारा जिल्ह्यातील शिंगोरी गावात जल जीवन मिशन अंतर्गत हर घर जल या केंद्र व राज्य शासनाने संयुक्त पणे राबविण्यात येणाऱ्या योजनेचा भाग म्हणून सिंगोरी गावात सदर योजना राबविण्यात आली होती , मात्र ३०-३-२०२३ ला गावात काम चालू झाले होते , आणि ३०-३-२०२४ ला काम पूर्ण झाले असे योजनेच्या फलकावर नमूद केले आहे , मात्र आज तारखेला सिंगोरी गाव पाण्यासाठी तळफळत आहे , गावात जे पाणी पुरवठा साधन आहे त्याला उन्हाळ्यात पिवळसर पाणी येते तर आम्ही पाणी कोणते प्यावे ? असे गावकऱ्यांनी म्हटले आहे ,

या योजनेच्या अंमलबजावणी यंत्रणेत कार्यकारी अभियंता ग्रामिण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद भंडारा , आणि अंमलबजावणी सहाय्य करण्यासाठी वाफकोस लिमिटेड आहे ,

पाण्याची टाकी निर्माण झाली , टाकीपासून लोकांच्या घरापर्यंत पाइपलाइन आली आहे , मात्र नळ कनेक्शन आजपर्यंत लोकांना मिळाले नाही , त्यामुळे लोकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते , याकडे मात्र शासन प्रशासन लोकप्रतिनिधी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत असा आरोप गावकरी करीत आहेत , शासनाचे लाखो रुपयांची गुंतवणूक ही कुचकामी दिसते आहे , याकडे संबंधित अधिकारी आणि विभागाचे लवकर लक्ष द्यावे , नाहीतर गावकऱ्यांनी रस्ता रोको आंदोलन ,उपोषनाची तयारी दर्शविली आहे , तसेच कोणत्याही प्रकारचा कर देणार नाही असे गावकरी बोलत आहेत.

गट ग्रामपंचायत ला जर आमचे समस्या समाधान करता येत नसेल तर त्यांनी सिंगोरी कोकनागड अशी वेगळी ग्रामपंचायत द्यावी अशी मागणी गावात जोर धरू लागली आहे.

अवैध रित्या वाहनातून गोवंशाची वाहतूक केल्याप्रकरणी वाहन चालकावर गुन्हा दाखल



रिसोड ■ प्रतिनिधी

रिसोड : अवैध रित्या वाहनातून गोवंशाची वाहतूक केल्याप्रकरणी वाहन चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार गणेश रामदास सावडकर राहणार वाशिम यांनी रिसोड पोलिसात दिलेल्या फिर्यादी म्हटले आहे की, दिनांक १९ मार्च रोजी दुपारी एक वाजता च्या दरम्यान ते आपले मित्र महेश दायमा, सचिन भालेराव, स्वप्निल इंगोले यांचे सह रिसोड कडे येत असताना ग्राम चिखली जवळ दुपारी एक वाजता च्या दरम्यान एम एच २६ बीई ६३९९ या अशोक लेलँड वाहनांमध्ये त्यांना जनावरे दिसले. यामध्ये दोन गाई आणि एक वासरू असे आढळून आले. त्यामध्ये वाहनचालकास सदर जनावरांची वाहतुकीच्या परवान्याबद्दल विचारले असता त्याच्याजवळ कोणत्याही प्रकारचा परवाना आढळून आला नाही. यामुळे सदर जनावरे ही कत्तलीसाठी नेत असल्याचा संशय आला. यावरून याबाबतची माहिती ११२ वरून रिसोड पोलिसांना देण्यात आली रिसोड पोलिसांनी घटनास्थळ गाठून वाहन चालकासह रिसोड पोलीस स्टेशनला आणून चालक वसीम खान राहणार रिसोड याच्या विरोधात रिसोड पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

रविकांत तुपकर यांना कर्जमाफी आंदोलनाच्या दरम्यान मुंबई मध्ये अटक

वाशिमच्या कार्यकर्त्यांनी रिसोड- वाशिम महामार्गावर टायर पेटवून रविकांत तुपकर यांच्या अटकेचा दर्शविला निषेध

रिसोड ■ प्रतिनिधी



रविकांत तुपकर यांना कर्जमाफी आंदोलनाच्या दरम्यान मुंबई मध्ये अटक झाली

त्या अनुषंगाने वाशिम येथील कार्यकर्त्यांनी रिसोड वाशिम महामार्गावर टायर पेटवून रविकांत तुपकर यांच्या अटकेचा निषेध शेतकरी नेते क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री रविकांत भाऊ तुपकर यांना मुबंई पोलिसांनी अटक केली त्या वाशिम रिसोड रोड वर टायर जाळून निषेध करण्यात आला शेतकऱ्यांना कर्जमाफी सोयाबीनला भाव कापसाला भाव पिक विमा दुधाला भाव कांद्याला भाव धानाला भाव इत्यादी मागणीसाठी मुंबई अरबी समुद्रामध्ये शेतकऱ्यांचे सातबारा बुडून शांततेच्या मार्गाने असलेल्या आंदोलन महाराष्ट्राच्या सरकारने पोलिसांच्या खांद्यावर बंदूक ठेवून शेतकऱ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला शेतकरी नेते रविकांत तुपकर यांना अटक केली असंख्य कार्यकर्त्यांना अटक केली या निषेधार्थ म्हणजे आंदोलन करण्यात आले.

पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांनी लाखांदूर पोलीस स्टेशनला दिली भेट, कार्यप्रणालीचा घेतला आढावा



भंडारा ■ प्रतिनिधी

भंडारा : लाखांदूर - भंडारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांनी लाखांदूर पोलीस स्टेशनला भेट देऊन तेथील कार्यप्रणाली व व्यवस्थापनाचा सखोल आढावा घेतला. त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांची परेड निरीक्षण करून त्यांचे प्रशिक्षण आणि शिस्तबद्धता तपासली. त्यानंतर संपूर्ण पोलीस स्टेशन परिसरात फेरफटका मारून स्वच्छता, नागरिकांसाठी उपलब्ध सुविधा, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कार्यस्थळ, गुन्हेगारी रेकॉर्ड तसेच मुद्देमाल यासंबंधी सखोल पाहणी केली.

यावेळी पोलीस पाटील, पोलीस स्टेशन हद्दीतील नागरिक व शांतता कमिटी सदस्यांसोबत विशेष बैठक घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. मुख्यमंत्री सात कलमी १०० दिवस टार्गेट कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील १५ पोलीस ठाण्यांचे आयएसओ प्रमाणपत्र नोंदणी प्रक्रियेचे काम वेगाने सुरू असून, लाखांदूर पोलीस स्टेशनने हे मानांकन प्राप्त केले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांनी ठाणे पोलीस निरीक्षक सचिन पवार आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.

श्री. सरस्वती भुवनचे शिक्षक संदीप खिरे यांना आदर्श शिक्षकरत्न पुरस्कार

सोयगाव ■ भावराव मोरे



सोयगावः माणुसकी मल्टीपर्पज फाउंडेशन मलकापूर, जि. बुलढाणा यांच्या वतीने राज्यस्तरीय राष्ट्रभक्ती सेवा गौरव पुरस्कार २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या २० व्यक्तींची निवड करण्यात आलेली होती. या सर्व २० पुरस्कारार्थिंना आज मान्यवरांच्या शुभहस्ते तालुका शिक्षक संघ पतसंस्था हॉल मलकापूर, जि. बुलढाणा येथे पुरस्कार वितरण करण्यात आले.

यामध्ये श्री. सरस्वती भुवन शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर संचलित श्री सरस्वती भुवन हायस्कूल गोंदेगाव,येथील कृतीशील गणित शिक्षक संदिप विठ्ठलराव खिरे यांनी शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा, आणि सांस्कृतीक क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेऊन माणुसकी जपत त्यांची निवड करून त्यांना मानाचा इराज्यस्तरीय राष्ट्रभक्ती सेवा गौरव पुरस्कार

देऊन आदर्श शिक्षकरत्न म्हणून सन्मानित करण्यात आले. सोबत फ्रेम केलेले सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते त्यांचा सहकुटुंब गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवातीर्थ धाम वृद्धाश्रम दाताळा, ता. मलकापूर जि. बुलढाणा येथील प्रमुख वसंत विठ्ठल पाटील हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून जळगावचे सुप्रसिद्ध शिक्षणतज्ञ प्रा.डॉ.अतुल संतोष सूर्यवंशी आणि ओम शांती सेवा समिती, मलकापूर चे अध्यक्ष सचिन भंसाली यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन माणुसकी मल्टिपर्पज फाउंडेशनचे अध्यक्ष विवेक राजापुरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते. तसेच सूत्रसंचालन रविंद्र चैत्राम देवरे यांनी केले. यावेळी या कार्यक्रमास महाराष्ट्रातील सर्वच क्षेत्रातील नामवंत आणि कीर्तिवंत व्यक्तींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. संदीप खिरे यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष दिनेशजी वकील, सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे, स्थानिक शालेय समितीचे अध्यक्ष डॉ.योगेश इंगळे व शालेय समिती सदस्य, केंद्रप्रमुख सचिन पाटील, प्रशालेचे मुख्याध्यापक आर.एस.माळी, उपमुख्याध्यापक एस.आर.दाभाडे, पर्यवेक्षक जी.जी.ढाकणे, तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर सहकारी, पालक आणि विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

फलटणच्या ॲड. कांचनकन्होजाताई धोंडीराम खरात यांना साताऱ्यात 'दीपस्तंभ नारी सन्मान पुरस्काराने ध्यास फाऊंडेशनकडून सन्मानित

सातारा ■ प्रतिनिधी



सातारा : आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर ध्यास फाउंडेशन आयोजित दीपस्तंभ नारी सन्मान पुरस्काराचे वितरण सोहळा नितीन तारळकर जिल्हा क्रीडा अधिकारी,वसंत शिंदे ज्येष्ठ साहित्यिक व प्रोप्रायटर शिंदे फर्निचर आणि अमेय भागवत, न्यूट्रिशन आणि डायटीशियन यांच्या उपस्थितीत पार पडला.

सामाजिक (विविध) क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या नऊ महिलांचा सत्कार करत असताना त्यांच्या कार्याचा गुणगौरव येथे करण्यात आला.

या पुरस्कारासाठी ॲड. कांचनकन्होजाताई धोंडीराम खरात (फलटण) यांच्यासह डॉ. शुभांगी गायकवाड (सातारा), श्रीमती शैला वसंत यादव (औंध), सौ. कुमुदिनी जगदीश पांढरे (सासवड), सौ. विमल चिंतामणराव मुंडे (रायगड), डॉ. नीलम दिलीप शिंदे (सांगली), सौ. हेमलता किसन फडतरे (खटाव), ॲड. सुचित्रा काटकर (सातारा). श्री नितीन तारळकर व श्री वसंत शिंदे यांनी आपल्या सद्भावना सर्व महिलांना दिल्या व ध्यास फाउंडेशन यांच्या कार्याचा गौरव केला. नितीन तारळकर यांनी खेळाचे महत्व व स्त्री विकास याचे महत्त्व विशद केले तर श्री वसंत शिंदे यांनी महिला दिनाचा इतिहास सांगत महिला कालची व आजची यावरती दोन कविता सादर केल्या.कार्यक्रमाची सुरुवात श्री गणेश वंदन करुन झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय ध्यास फाउंडेशनच्या संस्था अध्यक्ष डॉक्टर वैजयंती ओतारी यांनी केले सत्कारमूर्तींचा परिचय डॉक्टर सरिता नाईक , सौ.सुप्रिया जाधव व सौ.धनश्री जगताप यांनी केले. ॲड. सुरेश रुपनवर यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.पदमा ओतारी यांनी केले. प्रमिला जाधव या अंधभगिनीने सर्व मान्यवरांना व पुरस्कार विजेत्या भगिनींना खत निर्मितीची बास्केट दिली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

निळेश्वर माध्यमिक विद्यालयात पार पडली 'नैसर्गिक रंग निर्मिती कार्यशाळा'

कराड ■ प्रतिनिधी



ज्ञान प्रसारक शिक्षण संस्था संचलित निळेश्वर माध्यमिक विद्यालय, वडोली निळेश्वर येथे संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. सुरेश संकपाळ (भाऊ) यांच्या प्रेरणेने आणि निळेश्वर माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे उपाध्यक्ष श्री.सचिन नलवडे (सर) यांच्या मार्गदर्शनाने विद्यालयात, विद्यालयाचा माजी विद्यार्थी श्री. राहुल पवार यांनी सोमवार दि. १७/०३/२०२५ रोजी 'नैसर्गिक रंग निर्मिती' ही कार्यशाळा आयोजित केली होती.

बाजारात मिळणारे रसायनांचा वापर केलेल्या रंगांचा उपयोग करून रंगपंचमी हा सण साजरा केला जातो.या रंगांमध्ये वापरलेल्या रसायनांमुळे आपल्या शरीरावर घातक परिणाम होतात. डोळ्यांची जळजळ, चेहऱ्यावर डाग पडणे तसेच कॅन्सर सारखे भयानक रोग सुद्धा यामुळे होत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अशा बाजारात मिळणाऱ्या रसायनांचा वापर केलेल्या रंगांचा वापर टाळून नैसर्गिक रंगांचा वापर करून रंगपंचमी हा सण साजरा करावा या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत श्री राहुल पवार यांनी हळकुंडापासून पिवळा रंग तसेच केशर पासून केसरी रंग कसा तयार करायचा याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. यावेळी नदी प्रदूषण जागतिक तापमान वाढ देशातील ३१५ दूषित आहे महाराष्ट्रातील ५४ नद्या दूषित आहेत रासायनिक केमिकल युक्त कलर मुळे पाणी दूषित होते व पर्यावरणाचा घात होतोय त्यामुळे रंगपंचमी साजरी करताना पर्यावरण रक्षण काळाची गरज आहे यासाठी सातत्याने काम करणे गरजेचे आहे विद्यार्थ्यांनी या समस्येवर जागृत राहणे गरजेचे आहे विवेकानंद पर्यावरण फौज गोवा कृष्णा नदी बचाव चळवळ कराड यांच्यावतीने पर्यावरण पूरक रंगपंचमी साजरी करण्यासाठी आव्हान करण्यात आले कृष्णा नदी चळवळ प्रवर्तक राहुल पवार यांनी सांगितले नैसर्गिक कलर पर्यावरण पूरक याचा वापर करावा यावेळी शाळेच्या वतीने आव्हान की ज्यांना असे रंग तयार करणे शक्य नाही त्यांच्यासाठी श्री. राहुल पवार सर यांनी गोव्यामधून काही तयार नैसर्गिक रंग आणले होते. ते रंग ज्यांना हवे आहेत त्यांनी ना नफा ना तोटा या किमतीत विकण्याचे ठरवले.

सर्व विद्यार्थ्यांनी नैसर्गिक रंगांचा वापर करून आपल्या शरीराची हानी तसेच पाणी प्रदूषण टाळून रंगपंचमी हा सण साजरा करावा असे आवाहन मुख्याध्यापक श्री. सचिन नलावडे सर यांनी सर्व विद्यार्थ्यांना केले या कार्यशाळेसाठी शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

युवकाची गळफास लावून आत्महत्या

रिसोड ■ प्रतिनिधी

रिसोड : एका २६ वर्षीय युवकाने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना दिनांक १८ मार्च रोजी दुपारी दोन वाजता उघडकीस आली. निलेश शिवाजी रणखांब वय २६ वर्षे असे मृतकाचे नाव असून याबाबत रिसोड पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार रिसोड तालुक्यातील मोठेगाव शेत शिवारात एका व्यक्तीने गळफास लावल्याची माहिती रिसोड पोलिसांना मिळताच पोलिस स्टेशनचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले मोठेगाव शेत शिवारात झाडाला गळफास लावलेल्या अवस्थेत निलेश हा आढळून आला. निलेश रिसोड तालुक्यातील वाकद येथील रहिवासी असून त्याचा मृतदेह रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दाखल करण्यात आला. याप्रकरणी रिसोड पोलिसांनी मर्ग दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.आत्महत्येचे कारण अद्याप कळू शकले नाही.

'नैना' प्रकल्प क्षेत्रातील बांधकाम संरक्षित करण्यात येणार- नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : 'नैना' प्रकल्प क्षेत्रातील ५०३८ घरांपैकी ३१५५ बांधकाम संरक्षित करण्यात आले आहेत. उर्वरित बांधकामावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानपरिषदेत सांगितले. सदस्य विक्रांत पाटील यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना राज्यमंत्री श्रीमती मिसाळ बोलत होत्या.

नगरविकास राज्यमंत्री श्रीमती मिसाळ म्हणाल्या, या क्षेत्रातील भूखंड किंवा बांधकाम खरेदी-विक्री बंद करण्यात आली नसून फक्त बेकायदेशीर बांधकामे थांबविली आहेत. नगररचना परियोजनांमुळे नैना क्षेत्रातील विकासाला गती मिळणार असून, कोणत्याही बांधकामावर तातडीने कारवाई केली जाणार नाही. जमिन मालकांना अंतिम भूखंड देण्यात आले असून, त्यांच्या शंका दूर करण्यासाठी सिडको वेळोवेळी सभा घेत आहे. ४० टक्के विकसित भूखंड जमिनधारकांना मिळतो, तर ६० टक्के भूखंड सार्वजनिक सुविधा, रस्ते आणि अन्य प्रकल्पांसाठी राखीव असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यमंत्री श्रीमती मिसाळ म्हणाल्या, फक्त ८४९ घरांवरच रस्ता योजनांचा परिणाम होणार असून त्यावर वस्तुस्थिती तपासून निर्णय घेतला जाईल. रस्ते, पूल, पाणीपुरवठा, मलनिःसारण योजनांसाठी निविदा जारी करण्यात आल्या असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी सदस्य सदाभाऊ खोत, सचिन अहिर यांनी चर्चेत सहभाग घेतला.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242